cmyk

## संपादकीय

### सातारा केवळ निमित्त; ऑपरेशन वेगळे !

महाराष्ट्र विधीमंडळ अधिवेशनात सोमवारी दिवसभर सातारा येथे जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीवेळी मंत्री आणि त्या जिह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई, राष्ट्रवादीचे मंत्री मकरंद पाटील यांना पोलिसांकडून झालेल्या धक्काबुक्की प्रकरणावर आणि गोंधळावर जी चर्चा झाली त्यातून सत्ता पक्षातील शिंदे शिवसेनेला महाशक्तीचा पहिल्यांदाच वेगळ्या पद्धतीने महाप्रसाद मिळाला असे म्हणावे लागेल.



दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक


बीड – महाराष्ट्र | वर्ष–७ | अंक–५ | बुधवार दि.२५ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांचे उत्पन्न ‘आठपटीने’ वाढले !

## केंद्रीय कृषी मंत्र्यांचा लोकसभेत दावा, विरोधकांकडून मात्र वास्तव वेगळेच असल्याची टीका

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**लोकसभेत मंगळवारी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलेल्या दाव्यामुळे शेतकरी प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. “काही शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपटीने नव्हे तर आठपटीने वाढले,” असा दावा त्यांनी करत सरकारच्या कामगिरीचा उल्लेख केला. मात्र या दाव्यावर विरोधकांसह तज्ज्ञांकडूनही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.**



सरकारने २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपटीने करण्याचे आश्वासन दिले होते. त्या पार्श्वभूमीवर खासदार सौगत रॉय यांनी थेट प्रश्न विचारत, “हे उद्दिष्ट नेमके कधी पूर्ण होणार? आणि शेतकरी आत्महत्या शून्यावर कधी येणार?” अशी विचारणा केली. यावर उत्तर देताना कृषिमंत्र्यांनी काही निवडक उदाहरणे देत उत्पन्न वाढल्याचा दावा केला. मात्र वास्तवात देशभरातील शेतकऱ्यांची परिस्थिती पाहिली तर चित्र वेगळे दिसते. उत्पादन खर्च वाढ, बाजारातील अस्थिर दर, नैसर्गिक आपत्ती आणि कर्जबाजारीपणा यामुळे बहुतांश शेतकरी अजूनही आर्थिक अडचणीतच आहेत. काही शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले, हा दावा एकूण शेतकरी वर्गाचे प्रतिनिधित्व करत नाही, अशी टीका होत आहे. कृषिमंत्र्यांनी सांगितले की, शेतीसाठीची अर्थसंकल्पीय तरतूद मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आली आहे, तसेच पंतप्रधान किसान सन्मान ▶▶ पान २ वर

### ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान, विशेष पॅकेज देण्याची मागणी

तामिळनाडूतील कुड्डालोरचे काँग्रेसचे खासदार डॉ. एम. के. विष्णू प्रसाद यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान आणि विशेष पॅकेज देण्याची मागणी केली. ऊस उत्पादन खर्च वाढला आहे. मजूर मिळत नाहीत. किमान आधारभूत किंमत प्रतिटन ३,२९० रुपये आहे. १०० रुपये वाहतूक खर्च आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान, विशेष पॅकेज देणार आहात का? असा प्रश्न त्यांनी केला. त्यावर उत्तर देताना कृषिमंत्री चौहान यांनी, विशेष पॅकेज देण्याचा कोणताही प्रश्न नसल्याचे स्पष्ट केले. आम्ही ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# अखेर बारामती विमान दुर्घटनेत गुन्हा दाखल
# रोहित पवारांच्या लढ्याला कर्नाटकातून यश

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार याच्या लढ्याला अखेर यश आलं असून बारामतीमधील अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेप्रकरणी अखेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. बारामती विमानतळाजवळ झालेल्या लियरजेट ४५ विमान दुर्घटनेप्रकरणी कर्नाटकच्य बंगळुरू येथील शेशाद्रीपुरम पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला. या दुर्घटनेमागे मोठा गुन्हेगारी कट असल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. विशेष म्हणजे आजच रोहित पवार यांनी विधानसभेत



हा मुद्दा उपस्थित केला होता. नागपुरात बस स्टॉपवरुन चार्जर चोरीला गेली म्हणून गुन्हा दाखल झाला, चप्पल चोरीला गेली म्हणून गुन्हा दाखल झाला. अंगणात झाडाच्या फांद्या आल्या म्हणून गुन्हा दाखल झाला, मात्र अजित दादांच्या संदर्भात गुन्हा दाखल झाला नाही, ज्याचं जळतं त्यालाच कळतं, असेही रोहित पवार यांनी म्हटले होते.

अजित पवार प्रवास करत असेले मुंबईहून बारामतीकडे येणारे – नोंदणी असलेले बॉम्बार्डियर लियरजेट ४५ विमान २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.४३ ते ८.४५ वाजण्याच्या सुमारास कोसळले. हे विमान व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीद्वारे चालवले जात होते. या दुर्घटनेत विमानातील सर्व पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये त्या वेळचे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचाही समावेश होता. या प्रकरणी मृत अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १७३(१) अंतर्गत ‘झिरो ’ म्हणून तक्रार दाखल केली आहे. यापूर्वी त्यांनी ▶▶ पान २ वर

## निवडणूक आयोगाच्या पत्रावर भाजपचा शिक्का

कोच्ची । वृतसंस्था

**देशात पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि केरळमधील विधानसभा निवडणुकीसाठी तयारी सुरु असतानाच केंद्रीय निवडणूक आयोगाच्या एका अधिकृत पत्राने नवा वाद निर्माण केला आहे. निवडणूक आयोगाकडून राजकीय पक्षांना पाठवण्यात आलेल्या एका अधिकृत पत्रावर चक्क भाजप केरळ युनिटचा शिक्का आढळल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणावरून विरोधकांनी निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून आयोगाला भाजपची बी–टीम म्हटले आहे.**

केरळमध्ये ९ एप्रिल रोजी होणा–या मतदानापूर्वी सोशल मीडियावर एक पत्र व्हायरल झाले. १९ मार्च २०१९ च्या एका पत्रासोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्रावर निवडणूक आयोगाच्या अधिकृत शिक्क्याऐवजी भारतीय जनता पार्टी, केरळ असा शिक्का मारलेला दिसला. हे पत्र समोर येताच सीपीआय(ए) ने सोशल मीडियावरुन आयोगावर हल्लाबोल केला. भाजप आणि निवडणूक आयोग आता एकाच टेबलावरून काम करत आहेत का? असा बोचरा सवाल डाव्या पक्षांनी विचारला आहे. या प्रकरणावरून काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी आयोगाला घेरले आहे. आम्ही ऐकले होते की मतदान यंत्रावर कोणतेही बटण दाबले की कमळाला मतदान होते, पण निवडणूक आयोग आणि भाजप एकच शिक्का वापरत असल्याचे पहिल्यांदाच पाहत आहोत अशी टीका डाव्या पक्षाने केली. ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### महाराष्ट्र लोकभवनात बिहार राज्य स्थापना दिवस साजरा

मुंबई :महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र लोकभवन येथे ‘बिहार राज्य स्थापना दिवस’ साजरा करण्यात आला. ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ उपक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्र लोकभवनातर्फे बिहार राज्य स्थापना दिनाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. बिहार ही संस्कृती, अध्यात्म व तत्वज्ञानाची भूमी आहे. या भूमीने देशाला भगवान महावीर व भगवान बुद्ध दिले. भारत आज जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र आहे. परंतु त्याहीपेक्षा भारत लोकशाहीची जननी आहे व या लोकशाहीची पाळेमुळे बिहारमधील बुद्ध संघाच्या कार्यप्रणालीमध्ये आहे व त्यामुळे बिहार ही संसदीय परंपरांची जन्मभूमी आहे, असे प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी केले. बिहार येथील लोक महाराष्ट्रासह देशाच्या विभिन्न राज्यांमध्ये योगदान देत आहेत. मूळचे बिहार येथील अधिकारी आज अनेक राज्यात भारतीय प्रशासकीय सेवा व भारतीय पोलीस सेवेच्या माध्यमातून योगदान देत आहेत. बिहारी लोक देशाच्या सर्व भागात आहेत.

### महिला अधिकाऱ्यांना कायमस्वरूपी कमिशन

नवी दिल्लीः भारतीय लष्करामध्ये शॉर्ट सर्व्हिस कमिशनअंतर्गत सेवा बजावणाऱ्या महिला अधिकाऱ्यांसाठी सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. २४) ऐतिहासिक निर्णय दिला. लष्करातील महिलांविरुद्ध होणारा प्रणालीगत भेदभाव मान्य करत, न्यायालयाने आपल्या विशेष घटनात्मक अधिकारांचा (अनुच्छेद १४२) वापर केला आहे. ज्या महिलांना आतापर्यंत कायमस्वरूपी कमिशन ( ) नाकारले गेले होते, त्यांना कायमस्वरूपी कमिशन देण्याचा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभागी झालेल्या धाडसी महिला अधिकाऱ्यांसह अनेक महिलांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या मागील स्पष्ट आदेशांनंतरही केंद्र सरकार आणि लष्कर कायमस्वरूपी कमिशन देण्याबाबत पुरुषांच्या तुलनेत भेदभाव करत असल्याचा आरोप त्यांनी केला होता.

### भोंदूबाबाची माहिती दिवाळीमध्येच मग उशिर का

बुलढाणाः दिवाळीच्या आसपास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाची माहिती मिळाली होती. ऑक्टोबर, नोव्हेंबरपासूनच खरातचे गैरव्यवहार चव्हाट्यावर आले, गृहविभाग पुरावेही गोळा करत होते, मग मुख्यमंत्री सहा महिने झोपा काढत होते का?, असा संतप्त सवाल उपस्थित करून खरात प्रकरणाने जी विकृत चर्चा सुरु आहे ती महाराष्ट्रासाठी चांगली नाही. एसआयटीला अधिकची कुमक द्या, टास्क फोर्स लावा आणि दोषींना गडाआड करून या खरात प्रकरणाचा शेवट करा, असे आवाहन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. बुलढाणा येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, अशोक खरातचे प्रकरण अंधश्रद्धेतून निर्माण झाले आहे, यातून आपण धडा घेतला पाहिजे, वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगला पाहिजे. अंधश्रद्धा कोण वाढवत आहे, धर्माधर्मात, जाती जातीत वाद कोण निर्माण करत आहे. द्वेष कोण निर्माण करत आहे, हे सर्वांना माहित आहे. यातूनच खरात सारख्या विकृती जन्माला येतात याची दखल घेतली पाहिजे.

# खरातने पाच नरबळी दिल्याचा संशय!

## कोर्टात सरकारी वकिलांचा गौप्यस्फोट ; २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकमधील अशोक खरात प्रकरणात महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. तपासादरम्यान पोलिसांनी आरोपीकडून एक पिस्तूल जप्त केल्याची माहिती समोर आली आहे. या पिस्तूलाचा वापर करून पाच नरबळी दिल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, त्यासंदर्भातील काही प्राथमिक पुरावेही पोलिसांच्या हाती लागल्याचे सांगितले जात आहे. तसेच आरोपीकडे काही मालमत्तेची कागदपत्रेही सापडली असून, त्याद्वारे अनेक लोकांची फसवणूक केल्याचा संशय आहे. दरम्यान, खरातला २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी देण्यात



आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथक आणि क्राईम ब्रांचकडून केला जात आहे. तपासादरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर येत असून, आतापर्यंत सहा गुन्हे दाखल झाले आहेत. याशिवाय अनेक महिलांनी आरोपीविरोधात तक्रारी दिल्या आहेत. या महिलांची चौकशी अत्यंत गोपनीय पद्धतीने केली जात आहे. सरकारी वकील शैलेंद्र बागडे यांनी न्यायालयात सांगितले की, आरोपीविरोधात गंभीर स्वरूपाचे आरोप असून, त्याच्या तपासासाठी आणखी वेळ आवश्यक आहे. विशेषतः लैंगिक अत्याचाराशी संबंधित प्रकरणांमध्ये डिजिटल पुरावे गोळा करण्याचे काम अद्याप सुरू आहे. त्यामुळे पोलिसांनी न्यायालयाकडे आणखी सात दिवसांची पोलीस कोठडी देण्याची मागणी केली आहे करण्यात आली. अशोक खरात हा भक्तांना साप, वाघ दाखवायचा अशी माहिती ▶▶ पान २ वर

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा व अनुदानित शाळांचे ऑडिट होणार!

मुंबई । प्रतिनिधी

भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या शाळांची अवस्था लक्षात घेऊन सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा व अनुदानित शाळांचे ऑडिट करण्यात येणार आहे. शिक्षणासाठी अधिक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली.



सदस्य रईस शेख यांनी भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या शाळांच्या दुरवस्थेबाबत लक्षवेधी सूचना मांडली. यावर शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, शाळांमध्ये ड्रॉपआऊट कमी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील. स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागणी केल्यास नववी-दहावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यास तसेच आवश्यक शिक्षकांची नियुक्ती करण्यास शासन परवानगी देईल. शिक्षण क्षेत्रात अधिक गुंतवणूक होणे गरजेचे असून, यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून अतिरिक्त निधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जाईल. राज्यमंत्री ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२४ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: २५४.०० क्विंटल** | | |
| २,१६० | २,५०० | २,२४० |
| **ज्वारी/हायब्रिड: १८८.०० क्विंटल** | | |
| १,८०० | ४,५०० | ३,४४७ |
| **मका/लोकल: ३.५० क्विंटल** | | |
| १,५०० | १,५०० | १,५०० |
| **तूर : १.०० क्विंटल** | | |
| ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| **उडीद : २.५० क्विंटल** | | |
| ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| **बाजरी: ४.०० क्विंटल** | | |
| २,००० | २,७३१ | २,४१० |
| **मुग: २.०० क्विंटल** | | |
| ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| **सोयाबीन: १०.०० क्विंटल** | | |
| ५,३५० | ५,३५० | ५,३५० |
| **हरभरा: १९.०० क्विंटल** | | |
| ४,९०० | ५,८०१ | ५,१७५ |

# धर्म बदलल्यास ‘एससी’ दर्जा संपुष्टात येणार!

## सर्वोच्च न्यायालयाचा आरक्षणाबाबत ऐतिहासिक निकाल

दिल्ली । वृत्तसंस्था

देशाच्या आरक्षण धोरणावर आणि सामाजिक संरचनेवर मोठा परिणाम करणारा एक ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाने मंगळवार दि. २४ मार्च रोजी दिला असून हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर कोणताही धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तीला अनुसूचित जातीचा दर्जा मिळणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. महत्त्वाचे म्हणजे, धर्मांतर केलेल्या व्यक्तीला अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत मिळणारे संरक्षणही



न्यायालयाने नाकारले आहे.

न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. न्यायालयाने म्हटले की, संविधानाच्या कलम ३ नुसार, जो व्यक्ती हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त अन्य धर्माचे पालन करतो, त्याला अनुसूचित जातीचा सदस्य मानले जाऊ शकत नाही. धर्मांतराच्या क्षणापासूनच संबंधित व्यक्तीचा मूळ जातीचा दर्जा पूर्णपणे आणि तात्काळ संपुष्टात येतो. सर्वोच्च न्यायालयाने हायकोर्टाचा हा निर्णय कायम ठेवला. केवळ जातीचा दाखला जवळ असल्याने कोणताही फायदा मिळणार नाही, कारण धर्मांतरित व्यक्ती या कायद्यांतर्गत संरक्षणाचा दावा करू शकत नाही, असे कोर्टाने स्पष्ट केले. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात काही अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींवरही भाष्य केले. एखादी व्यक्ती एकाच वेळी ख्रिश्चन धर्माचे पालन करणे आणि अनुसूचित जातीचे असणे, असा दुहेरी दावा करू शकत नाही. तसेच धर्मांतर केल्यावर राज्य किंवा केंद्राकडून मिळणारे आरक्षणाचे लाभ, ▶▶ पान २ वर

### निकालाचे सामाजिक पडसाद

या निकालामुळे ख्रिश्चन किंवा इस्लाम धर्म स्वीकारलेल्या दलित समुदायातील व्यक्तींना आता आरक्षणाचे लाभ घेता येणार नाहीत. तसेच, जातीवाचक अत्याचाराच्या तक्रारी करताना त्यांना एससी, एसटी कायद्याचा आधार घेता येणार नाही. ख्रिश्चन धर्मात गेल्यानंतर जाती नष्ट होते, या तांत्रिक बाबीवर न्यायालयाने हा निकाल दिला असल्याने धर्मांतर विरोधी चर्चांना आता पुन्हा उधाण आले आहे.

## महिन्याला आता केवळ दोनदा गॅस बुकिंग

नवी दिल्ली । वृतसंस्था

**पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर देशातील एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सरकारने काही महत्त्वाचे नियम लागू केले आहेत. या नव्या नियमांचा थेट परिणाम घरगुती गॅस वापरणा–या ग्राहकांवर होणार असून प्रत्येक ग्राहकाला या बदलांची माहिती असणे आवश्यक आहे.**

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड(बीपीसीएल) ने जाहीर केलेल्या नव्या नियमानुसार, आता एका ग्राहकाला महिन्यात जास्तीत जास्त दोनच एलपीजी सिलिंडर बुक करता येणार आहेत. यापेक्षा जास्त सिलिंडर बुक करण्याचा प्रयत्न केल्यास सिस्टमकडून बुकिंग ब्लॉक केली जाऊ शकते किंवा अतिरिक्त तपासणी केली जाऊ शकते. सरकारकडून आर्थिक वर्षात (१ एप्रिल ते ३१ मार्च) १२ अनुदानित सिलिंडर दिले जातात. याशिवाय गरज असल्यास ग्राहक आणखी ३ नॉन-सब्सिडी सिलिंडर खरेदी करू शकतो.म्हणजेच एका कनेक्शनवर वर्षाला जास्तीत जास्त १५ सिलेंडर बुक करता येणार आहेत. यासोबतच बुकिंगच्या ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# सातारा केवळ निमित्त ; ऑपरेशन वेगळे !

महाराष्ट्र विधीमंडळ अधिवेशनात सोमवारी दिवसभर सातारा येथे जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीवेळी मंत्री आणि त्या जिह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई, राष्ट्रवादीचे मंत्री मकरंद पाटील यांना पोलिसांकडून झालेल्या धक्काबुक्की प्रकरणावर आणि गोंधळावर जी चर्चा झाली त्यातून सत्ता पक्षातील शिंदे शिवसेनेला महाशक्तीचा पहिल्यांदाच वेगळ्या पद्धतीने महाप्रसाद मिळाला असे म्हणावे लागेल. दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रेमाचा पाहुणचार झोडून शिंदे नुकतेच महाराष्ट्रात परतले आहेत. ऑपरेशन टायगर राबवून ठाकरे सेनेचे आणखी खासदार आपल्या पक्षात आणून राष्ट्रीय राजकारणात दबदबा निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पण केंद्रातील सत्ताधाऱ्यांना आता ती गरज उरलेली दिसत नाही. अजित पवार यांच्या निधनानंतर कमकुवत झालेल्या दोन्ही राष्ट्रवादी, बिहारमधील नितीश पर्वाचे झालेले पतन यांचा विचार करता आता आणखी एखादी शक्ती पुढे आणून पुन्हा प्रश्न निर्माण करण्यात भाजपच्या अमित शाहांसह केंद्रीय नेतृत्वालाही रस उरलेला दिसत नाही. अशा स्थितीत ते परत आल्यानंतर उजाडलेला महाराष्ट्र विधिमंडळाचा पहिलाच दिवस त्यांना असा महाप्रसाद देऊन जाईल असा त्यांनी विचारही केला नसेल.

दिल्लीहून परतल्याच्या एका माहोलमध्ये त्यांनी आपल्या पक्षाच्या आमदारांनी मंत्र्यांची सोमवारी सकाळी बैठक बोलावली आणि देवेंद्र फडणवीस यांना केंडीत पकडण्याची रणनीती आखली. त्यानुसार भल्या सकाळी सभागृहाच्या पायऱ्यावर शिंदे शिवसेनेने आंदोलन केले. साताराचे पोलीस प्रमुख दोशी यांचे निलंबन आणि बडतर्फ करण्याची मागणी केली. या प्रकरणात महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाचे दोन घटक एका बाजूला आणि भाजप दुसऱ्या बाजूला अशी स्थिती सभागृहात पाहायला मिळाली. पण, फडणवीस यांनी त्या सर्वांवर मात केली. एकनाथ शिंदे सांगत राहिले, शंभूराजे देसाई आपल्यावर अन्याय झाला म्हणत राहिले. त्यांच्या म्हणण्याला सत्य मानून विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी साताऱ्याचे जिल्हा पोलीस प्रमुख तुषार दोशी आणि निरीक्षक देवकर व इतरांच्या निलंबनाची घोषणा केली. याबाबत आपले म्हणणे मांडायला उठलेले सातारा जिह्यातीलच नेते आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना उपसभापतींनी आपण रुलिंग दिल्यानंतर निर्णय बदलता येत नाही असे त्यांचे वक्तव्य सुरू होण्यापूर्वीच सांगून टाकले. तरीही गोरे शंभूराजे देसाई यांची चूक सांगत राहिले. दरम्यान उपसभापती गोऱ्हे यांच्या जागी सभापती स्वत: येऊन विराजमान झाले. त्यानंतर गोरे यांनी गियर बदलला आणि उपसभापतींनी वस्तुस्थितीचा अहवाल न मागवता केलेली कारवाई नियमाला धरून नाही असे म्हणत उपसभापती असा निर्देश कसा देऊ शकतात? असे प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विधानसभेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सगळा पट उलगडून सांगितला. त्यातून भाजपला कचाट्यात पकडण्याचा त्यांचा हेतू होता. मात्र मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी उपमुख्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्याची चौकशी होईल अशी घोषणा करून हे प्रकरण सहज हातावेगळे केले. या प्रकरणात सभागृहाच्या बाहेर शिंदे शिवसेनेचे मंत्री, आमदार भांडत राहिले. त्याचवेळी त्यांच्या पक्षाचे आमदार महेश शिंदे असे काही घडलेच नाही असे माध्यमांमधून सांगत शंभूराजे देसाई यांना उघडे पाडण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे त्यांच्याच पत्नी भाजपच्या चिन्हावर निवडून येऊन सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष झालेल्या असल्याने शिंदे शिवसेनेची येथे कोंडी झालेली महाराष्ट्राने पाहिली. या सगळ्या घडामोडी नंतर उशिरा विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनीही चौकशीची घोषणा केलेली असल्याने, त्यांच्यापूर्वी उपसभापतींनी दिलेले रुलिंग आणि मंत्री उदय सामंत यांनी निलंबनाला मान्य करून कारवाईचा दिलेला शब्द चालणार का? की सभापतींच्या नव्या आदेशाप्रमाणे कामकाज होऊन जुना निलंबनाचा आदेश मागे पडणार? याबद्दलची चर्चा आता सुरू झाली आहे. एकूणच भाजप या प्रकरणात शिंदे शिवसेनेचे ऐकायला तयार नाही, हे दिसून आले आहे. त्याहून गंभीर म्हणजे शंभूराजे देसाई यांच्याबरोबरच अजित पवार राष्ट्रवादीचे मंत्री मकरंद पाटील यांनाही धक्के बसले होते. मात्र, हातची सत्ता गमावल्यानंतर देखील उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या कालावधीत सभागृहात फिरकल्याच नाहीत. परिणामी अजित पवार राष्ट्रवादीची अवस्था दादांच्या पश्चात कशी झाली आहे, याचीही चूणूक पाहायला मिळाली. या एका घटनेने त्यांचा पक्ष संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात बॅकफूटवर जाणार आहे. हे या घटनेने स्पष्टपणे दिसून आले. तिसरा ज्यांना या घटनेचा फटका बसला होता ते शरद पवार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे सभागृहात जिल्हा परिषदेच्या एका विधेयकावर बोलता बोलता त्यात साताऱ्याचे उदाहरण घेऊन बोलू लागले. पण, त्यातून महेश शिंदे यांना गद्दार म्हणण्यापलीकडे त्यांना फारसे काही साध्य करता आले नाही. त्यांचा मुद्दा बरोबर होता तो दीर्घकालीन परिणाम करणार आहे. पण, सभागृहातील विरोधकांची संख्या लक्षात घेता त्यांचीही अगतिकता मान्य करता येईल. मात्र सत्ता पक्षातील शिंदे शिवसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी यांची गलितगात्र अवस्था प्रथमच उघड झाली. या सर्वांनी भाजपला थेट टीकेचे धनी न करता पोलिसांच्यावर भरपूर आरोप केले. ''रेल्वे पोलिसातून आणलेला हा एसपी काय उद्योग करतोय?'' त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड काढण्याची मागणी करण्यात आली. देवेंद्र फडणवीस या हार्ड टार्गेटचे आपण काही करू शकत नाही म्हणून हे सॉफ्ट टार्गेट शोधून काढले का? असा प्रश्न या प्रकरणात निर्माण होतो. अंतरवाली सराटी प्रकरणात तुषार दोशी हेच अधिकारी होते. त्या काळातील या पक्षांची भूमिका आणि आजची भूमिका ताडून पाहिली तर त्यात किती बदल झाला आहे हे स्पष्टपणे दिसून येईल. उपसभापतीपदी गोऱ्हे या असल्याने त्यांनी आसनावरून मंत्री उदय सामंत, गणेश नाईक यांना विचारले ''सरकारला काही निवेदन आहे का?'' स्पष्ट उत्तर न आल्याने त्यांनी थेट निलंबनाचा निर्देश दिला. नंतर ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सातारा पालकमंत्र्यांनीच उच्छाद मांडला, पोलिसांशी शिवीगाळ, घरगड्यासारखे वागणे असे आरोप करत देसाईंना सरळ लक्ष्य केले. देसाई यांनी मोगलाई लागली आहे का? असा प्रश्न केला होता. त्याची परतफेड करत यशवंतरावांच्या जिह्यात असा पालकमंत्री? असा प्रश्न मंत्री गोरे यांनी केला. शिवसेनेचे अनिल परब यांनीही सभागृह गाजवले. परबांनी उदय सामंतांसह शिंदे गटावर प्रश्न उपस्थित केले. आता वाघ कुठे गेले? पालकमंत्री एकटे सापडले? म्हणत त्यांनी प्रकरणाला बळ दिले. त्याचवेळी आपला पक्ष फोडून बाहेर पडलेल्या या आपल्या जुन्या सहकाऱ्यांना खिजवण्याचा आनंद घेतला. लोकशाही व्यवस्था काही लोकांसाठी खास आणि काही लोकांसाठी अधिक खास सोयीची होत चालली आहे. त्याचा महाप्रसाद सत्ताधाऱ्यांपैकी दोन पक्षांनी चाखला इतकेच!

# वृत्तपत्रां जाहिरात मध्ये दरवाढ साठी पत्रकारांची मागणी

**अंबड । प्रतिनिधी**

**राज्यातील वृत्तपत्रांना १५०% दरवाढ देणे तसेच जाहिरात व प्रशासकीय धोरणांबाबत विविध मागण्यांना मान्यता देण्याबाबत निवेदन आज अंबड तहसीलदार यांना देण्यात आले यावेळी सदरील निवेदन नायब तहसीलदार संजय झोरे यांनी स्वीकारले. यावेळी पत्रकार संघटनेचे पत्रकार संतोष जीगे, शिवाजी मस्के, सुरेश खरात, गोविंद खरात, आकाश जळके, संजय उपाध्ये, शेख फिरोज, गणेश सपकाळ, गजानन पुरी यांच्यासह सर्व पत्रकाराच्यावतीने निवेदन देण्यात आले.**



राज्यातील वृत्तपत्र उद्योग हा लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून कार्यरत असून जनतेपर्यंत शासनाच्या योजना, निर्णय आणि धोरणे पोहोचवण्या अत्यंत महत्त्वाचे कार्य करीत आहे. तथापि, गेल्या काही वर्षांत वृत्तपत्र उद्योगावर आर्थिकदृष्ट्या मोठा ताण निर्माण झाला आहे. आम्ही अनेकवेळा व्हॉईस ऑफ मीडिया च्या वतीने या संदर्भात निवेदन दिले, आंदोलन केले पण त्याचा फायदा झाला नाही. आपण आता तरी याकडे लक्ष द्याल ही आपेक्षा आहे. सन २०१९ पासून आजतागायत कागद, प्रिंटिंग मटेरियल, केमिकल्स, वीज, मनुष्यबळ यांसारख्या मूलभूत खर्चामध्ये सुमारे १५०% पर्यंत वाढ झालेली आहे. परंतु याउलट शासनाकडून मिळणाऱ्या जाहिरात दरांमध्ये कोणतीही समर्पक वाढ झालेली नाही. त्यामुळे अनेक लघु व मध्यम वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. याच विषयाला घेऊन गेल्या ती दिवसापासून सर्व जिल्ह्याच्या ठिकाणी लाक्षणिक मागणी करत आंदोल सुरु आहे. जाहिरात दरात १५०% वाढ सन २०१९ ते मार्च २०२६ या कालावधीत महागाई निर्देशांकानुसार जाहिरात दरांमध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. त्यामुळे सर्व वृत्तपत्रांना किमान १५०% दरवाढ तातडीने मंजूर करण्यात यावी. ई-टेंडर जाहिराती पूर्ण स्वरुपात प्रसिद्ध करणे ई-टेंडर नोटिसेस संपूर्ण स्वरुपात वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात याव्यात जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत माहिती स्पष्टपणे पोहोचेल. किमान जाहिरात आकार २०० चौ. से. निश्चित करणे जिल्हा माहिती कार्यालय, विभागीय कार्यालये व इतर शासकीय/निमशासकीय संस्था यांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या जाहिराततींसाठी किमान २०० चौ. से. चा आकार निश्चित करावा, जेणेकरून वृत्तपत्रांना आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य मोबदला मिळेल. जाहिरात देयके ३० दिवसांत अदा करणे शासकीय जाहिरातींचे देयक ३० दिवसांच्या आत अदा करण्यात यावे. विलंब झाल्यास संबंधित रकमेवर बँक दराने व्याज देण्यात यावे. पत्रकारिता क्षेत्रामध्ये दहा वर्षे सेवा करणाऱ्या पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका देण्यात यावी, शंकरराव चव्हाण पत्रकारिता पेन्शन निधीच्या अर्ट शिथिल करून वीस वर्षे पत्रकारिता क्षेत्रात काम करणाऱ्या व ५५ वर्ष वय असणाऱ्या पत्रकारांना पेन्शन निधीचा लाभ व्हावा ह्या दोन मागण्या पण्? यात आहे. ५. लघु व मध्यम वृत्तपत्रांना समान संधी मोठ्या वृत्तपत्रांप्रमाणेच लघु व मध्यम वृत्तपत्रांनाही जाहिरातींचे वितरण न्याय्य पद्धतीने करण्यात यावे. जाहिरात वाटपात भेदभाव होऊ नये. शासन निर्णय व बैठकींची पारदर्शकला शासनाच्या विविध बैठका, निर्णय व धोरणे यांची माहिती वेळेत आणि अधिकृतपणे प्रसिद्ध करण्यात यावी, अशी मागणी पत्रकार संघटनेची आहे.

# पोहरागडावरील राष्ट्रीय बंजारा जनजागृती मेळाव्याच्या ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार व्हा-रविकांत राठोड

**वाशिम । वृतसंस्था**

**समस्त बंजारा समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या पोहरागड येथे होणाऱ्या अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला लाखोंच्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांतभाऊ राठोड यांनी केले आहे.**



बुधवार, २५ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता बंजारा ब्रिगेडच्यावतीने बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांतभाऊ राठोड यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली बाबनलाल महाराज मैदान, पोहरागड, जि. वाशिम येथे अखिल भारतीय स्तरावरील बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला समाजभूषण, महंत कबीरदास महाराज, आमदार धर्मगुरू बाबूसिंग महाराज राठोड यांच्यासह अनेक संत, नेते मेळाव्याला उपस्थित राहून अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला उपस्थित राहुन समस्थ बंजारा समाजाला संबोधित करणार आहेत. या मेळाव्याला महाराष्ट्रासह तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक राज्यातून लाखोंच्या संख्येने समाज बांधव उपस्थित राहणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांनी दिली. इतिहासात पहिल्यांदाच पोहरागडावर हेलिकॉप्टरने होणार पुष्पवृष्टी बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांच्या पुढाकारातून इतिहासात पहिल्यांदाच गुरुवार, २६ मार्च रोजी सकाळी ९ वाजता आई जगदंबा देवी मंदीर, संत सेवालाल महाराज मंदिर, संत बामनलाल महाराज मंदिर, संत रामराव महाराज समाधी व उमरीगड येथील संत जेतालाल महाराज मंदिर व सामकी माता मंदिरावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे, अशी माहिती समाजाचे नेते रविकांत राठोड यांनी दिली.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांचे उत्पन्न

निधी, खत अनुदान, केसीसी कर्ज यांसारख्या योजना राबवल्या जात आहेत. मात्र या योजनांचा प्रत्यक्ष लाभ सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतो का, यावरही प्रश्न उपस्थित होत आहेत. अनेक ठिकाणी अर्ज प्रलंबित, अनुदान वितरणात विलंब आणि तांत्रिक अडचणी यामुळे शेतकऱ्यांना लाभ मिळण्यात अडथळे येत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. मध्य प्रदेशातील उदाहरण देत ''तीन पिके घेतली जात आहेत'' असे मंत्री म्हणाले, मात्र देशातील सर्व राज्यांमध्ये अशी परिस्थिती नाही. विशेषतः दुष्काळग्रस्त आणि पावसावर अवलंबून असलेल्या भागांमध्ये अजूनही एकाच पिकावर शेतकऱ्यांना अवलंबून राहावे लागत आहे. सरकारकडून मोठे दावे आणि आकडे मांडले जात असले, तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांचे उत्पन्न व्यापक पातळीवर दुपटीने वाढल्याचे ठोस, सर्वसमावेशक आकडे समोर आलेले नाहीत. त्यामुळे ''आठपटीने उत्पन्न वाढ'' हा दावा वास्तवाशी कितपत सुसंगत आहे, यावर आता गंभीर चर्चा सुरू झाली आहे. एकूणच, सरकारच्या योजनांचा फायदा काही मर्यादित शेतकऱ्यांपर्यंतच पोहोचत असल्याचे चित्र दिसत असून, व्यापक स्तरावर शेतकरी अजूनही संघर्ष करत असल्याची वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

---------

### निवडणूक आयोगाच्या

तर निवडणूक आयोग भाजपच्या कार्यालयातून चालतोय का? तुमच्या लेटरहेडवर भाजपचा शिक्का येतोच कसा? असा सवाल काँग्रेसने केला. तृणमूलच्या खासदार महुआ मोइत्रा यांनी आयोगाने आता स्वत:च अधिकृतपणे कबूल केले आहे की ते भाजपची बी-टीम आहेत अशी टीका केली. वाढता वाद पाहून केरळच्या मुख्य निवडणूक अधिका-यांनी तातडीने स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, भाजपच्या केरळ युनिटने उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या मार्गदर्शक तत्त्वांची माहिती मागवली होती. त्यासाठी त्यांनी २०१९ च्या एका जुन्या आदेशाची झेरॉक्स प्रत आयोगाकडे जमा केली. त्या फोटोकॉपीवर भाजपचा शिक्का आधीच होता. कार्यालयातील कर्मचा-यांच्या नजरचुकीमुळे, भाजपचा शिक्का असलेली तीच प्रत तशीच इतर सर्व राजकीय पक्षांना आणि निवडणूक अधिका-यांना पाठवण्यात आली.

------------

### अखेर बारामती विमान दुर्घटनेत

२५ फेब्रुवारी रोजी मुंबईतील मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे तसेच २६ फेब्रुवारी रोजी बारामती पोलीस ठाण्यात संपर्क साधला होता. मात्र, नोंदवण्यात आला नव्हता. त्यानंतर पुणे सीआयडीकडून केवळ अपघाती मृत्यू अहवालाच्या दृष्टीने तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले होते.रोहित पवार यांच्या तक्रारीनुसार, ही दुर्घटना केवळ अपघात नसून उपमुख्यमंत्र्यांना लक्ष्य करणाऱ्या मोठ्या गुन्हेगारी कटाचा भाग असू शकतो. तक्रारीत विमान सुरक्षेच्या नियमांचे पद्धतशीर उल्लंघन, नोंदींची बनावट कागदपत्रे तयार करणे, देखभाल आणि ऑपरेशनमध्ये गंभीर निष्काळजीपणा अशा अनेक बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. २४ फेब्रुवारी रोजी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने सादर केलेल्या सुरक्षा लेखापरीक्षण अहवालात कंपनीची काही विमाने निष्काळजीपणामुळे उड्डाणासाठी अयोग्य असल्याचे नमूद करण्यात आले असून, ती विमाने ग्राउंड करण्यात आल्याचेही सांगितले आहे. तसेच, दुर्घटनाग्रस्त विमानाने सुमारे ४९१५ उड्डाण तास पूर्ण केले होते, जे ५००० तासांच्या अनिवार्य इंजिन 'टाइम बिफोर ओव्हरहॉल' मर्यादेच्या अत्यंत जवळ होते. तरीही कंपनीने व्यावसायिक वापरासाठी विमान चालू ठेवले होते, ज्यामुळे प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला, असे तक्रारीत म्हटले आहे.

-------------

### स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा

माधुरी मिसाळ यांनी सांगितले की, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत ८६ प्राथमिक व ११ माध्यमिक अशा ९७ महानगरपालिका शाळांचे संचलन केले जाते. ९७ शाळा या यापूर्वी ५१ शालेय इमारतींत भरत होत्या. तथापि, सदर इमारतींपैकी पाच इमारती धोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्याने उर्वरित ४६ शालेय इमारतींमध्ये शाळा सकाळ-दुपार सत्र पद्धतीने सुरू आहेत. धोकादायक ठरलेल्या शाळांच्या इमारतींचे ऑडिट करून विद्यार्थ्यांना इतरत्र हलविण्यात आले आहे. विविध शाळांच्या दुरुस्ती व नूतनीकरणासाठी कोट्यवधींचा निधी मंजूर करण्यात आला असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. महानगरपालिकांनी शिक्षणासाठी स्वतंत्र निधी राखून ठेवण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता असून याबाबतही प्रयत्न करण्यात येईल, असेही राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी नमूद केले.

-----------

### खरातने पाच नरबळी

तपासात समोर आली आहे. पोलीस कोठडीची मागणी करताना सरकारी वकिलांनी याचा उल्लेख केला. खरातने बोटात घालायचे खडे कुठून आणले, मिश्रित पाणी कुठून आणले, याचा तपास करायचा असून त्याच्याकडे पाच जिवंत काडतुसेही सापडले आहेत, याकडे सरकारी वकिलांनी कोर्टाचे लक्ष वेधले. अशोक खरात प्रकरण दिवसेंदिवस अधिक गंभीर आणि गुंतागुंतीचे होत असून, तपास यंत्रणा विविध अंगांनी या प्रकरणाचा तपास करण्याचा प्रयत्न करत आहेत. आता पुढील तपासाला काय वळण लागते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, अशोक खरात प्रकरणाच्या सुनावणीसाठी कोर्टात वकिलांनी गर्दी केली होती. दुपारी साडे तीनच्या सुमारास कोर्टात वकिलांची संख्या वाढत गेली. पावणे चारच्या सुमारास खरात प्रकरणाच्या सुनावणीचा पुकारा झाला. मात्र, त्यानंतर तब्बल १० मिनिटांनी खरात न्यायालयासमोर हजर झाला. दुपारी ३.५० च्या सुमारास तो न्यायाधीशांसमोर आला. यानंतर सुनावणीला सुरूवात झाली. कोर्टाने अशोक खरातला २९ मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

-------------

### महिन्याला आता केवळ

कालावधीतही बदल करण्यात आला आहे. आधी दुसरा सिलिंडर २१ दिवसांनी बुक करता येत होता, मात्र आता ही मर्यादा वाढवून २५ दिवस करण्यात आली आहे. त्यामुळे ग्राहकांना पुढील सिलेंडर बुक करण्यासाठी थोडा अधिक वेळ वाट पाहावी लागणार आहे.

-----------

### धर्म बदलल्यास 'एससी'

घटनात्मक संरक्षण आणि इतर सवलती तात्काळ थांबवायला हव्यात. जर एखाद्या व्यक्तीला पुन्हा हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्मात येऊन अनुसूचित जातीचा दर्जा हवा असेल, तर त्यासाठीच्या तीन कडक अटी पूर्णपणे सिद्ध कराव्या लागतील. हा खटला आंध्र प्रदेशातील पादरी चिंथदा आनंद यांच्या अपीलावर आधारित होता. आनंद यांनी अक्काला रामिरेड्डी आणि इतरांविरुद्ध जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी एससी, एसटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने ही एफआयआर रद्द केली होती. आनंद हे गेल्या १० वर्षांपासून ख्रिश्चन धर्माचे पालन करत आहेत आणि चर्चमध्ये पादरी म्हणून प्रार्थना घेतात. ख्रिश्चन धर्मात जातीभेद अस्तित्वात नाही, त्यामुळे धर्मांतरानंतर त्यांनी आपला अनुसूचित जातीचा दर्जा गमावला आहे असे निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले होते. आता सवोच्च न्यायालयाचे तसेच मत पडले आहे.

----------

## पान ६ वरून...

### बीड जिल्हा परिषदेच्या १७

अधिकारी (सा.) प्रदीप काकडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील, प्राथमिक शिक्षणाधिकारी (प्रा.) डॉ. किरण कुंवर, समाज कल्याण अधिकारी मेश्राम, कार्यकारी अभियंता मोमीन, आदी विभागप्रमुख यांच्यासह वित्त विभागाचे लेखाधिकारी विलास ढोले, आरसुळ, ठोंबरे, सवाशे उपस्थित होते.

-----------

### अंधश्रद्धा-बुवाबाज 'महिलांचे

पाठविले असल्याची माहिती जिल्ह्याचे उपाध्यक्ष प्राचार्य कॉ डी जी तांदळे यांनी दिली आहे. यासंबंधाने अधिक माहिती अशी की,समाजातील असुरक्षीतता, अशाश्वत जीवन, भिती, अंध श्रद्धा,व विविध समस्यांचा गैरफायदा घेत 'तथाकथीत फल ज्योतिष्य, अध्यात्म,दैवी शक्ती'च्या नावाखाली महिलांचे व जनतेचे भयंकर शोषण कसे केले जाते,याचे खरात प्रकरणामुळे चिंताजनक व संतापजनक चित्र पुन्हा समोर आले आहे. म्हणून,सदर प्रकरणाची निष्पक्ष,निर्भय,पारदर्शक चौकशी करून सर्व संबंधितांना कठोर शासन होईल,अशी हमी निर्माण व्हावी. तद्वतच,'' महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष,अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन अधिनियम,२०१३'' या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.आणि,या 'कायद्याअंतर्गत नियमावली' तयार करण्याचीअनेक वर्षापासून रखडलेली प्रक्रिया शासनाने गांभीर्याने पुर्ण करावी.राज्यघटनेने अधोरेखित केलेल्या 'वैज्ञानिक दृष्टिकोन' मुल्यासाठी शाळा- कॉलेजेस ,समाज-संस्थां मध्ये जनजागृती अभियान राबवावे.राजकिय पक्ष व नेत्यांचे अशा भोंदू बाबा-बुवा- बाया-मांत्रिक-ज्योतिषी यांचेशी असलेले संबंध तत्काळ तोडून विवेकी आचारसंहिता तयार करावी.फलज्योतिषी,अंकशात्र ,हस्तरेषातज्ञ यांचा जादूटोणा विरोधी कायद्यात समावेश करण्यात यावा. अशोक खरातचे व त्यासारखे प्रकरणे राज्यभर असण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता,सर्व जिल्हा पोलीस प्रशासनाला रितसर तपास करुन,गुन्हे नोंदविण्याचे स्पष्ट निर्देश द्यावेत. या व संबंधित मागण्यांचे निवेदन मा.मुख्यमंत्री महोदयांना बीडचे मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत पाठविले आहे. निवेदनावर मअंनि समितीचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे,विवेक वाहिनीच्या राज्य कार्यवाह प्राचार्य सविता शेटे, जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य कॉ डी जी तांदळे,बीड शाखेचे कार्या ध्यक्ष प्रा विजय घेवारे, प्रधान सचिव विधिज्ञ कॉ करुणा टाकसाळ ,युवा विभागाचे प्रतिक राऊत,सांस्कृतीक विभागाचे आदित्य विर,विधिज्ञ कॉ नितीन रांजवण,विधिज्ञ अनिता जोगदंड,विधिज्ञ मीरा डोईफोडे,लेक लाडकी अभियानचे समन्वयक बाजीराव ढाकणे, समता प्रतिष्ठानच्या शुभांगी कुलकर्णी,कौशल्या बावने,राणी कातखेडे,मातृभुमी प्रतिष्ठानचे डॉ संजय तांदळे,प्रवीण सोनवणे,शेर-ए-हिंद संस्थेचे शेख अमर पाशा,किरण घाडगे,एकल महिला संघटनेच्या रुक्मिणी नागापुरे,तेजस्विनी भाटे, रनजित माने यांच्या स्वाक्ष-या आहेत.

-------------

### पाटोदा तालुक्यात

आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्षात होत असलेला विलंब हा प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. या प्रकारामुळे मृतांच्या कुटुंबीयांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असून, कायदेशीर प्रक्रियाही विलंबित होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून ही केवळ प्रशासकीय त्रुटी आहे की जाणीवपूर्वक दुर्लक्ष, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन पाटोदा ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रिया वेळेत व सुरळीत पार पडावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशीही मागणी जोर धरत आहे.

-----------

### अपघातग्रस्तांना तात्काळ मदतीसाठी

पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना वितरित करण्यात आले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक सौ. चेतना तिडके, सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी, जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी एपीआय सानप उपस्थित होते. या उपक्रमामुळे अपघाताची माहिती अधिक अचूक, पारदर्शक व वेळेत नोंदवली जाईल आणि नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ जलद गतीने मिळेल. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागरिकांना अधिक स्मार्ट, जलद व पारदर्शक सेवा देण्यासाठी बीड पोलिस कटिबद्ध असल्याची ग्वाही पोलीस अधीक्षक यांनी यावेळी दिली.

-------------

### सावता प्रतिष्ठान मध्ये शब्बीर अन्सारी

ट्रस्टचे सचिव श्री श्यामसुंदर घाडगे यांनी केले.प्रास्ताविक मोहन मोहनराव गोरे यांनी केले. याप्रसंगी सर्वश्री नगरसेवक नितीन साखरे, नामदेवराव दुधाळ, ,दिनकर जमदाडे, महादेव दुधाळ,किशोर जवंजाळ, बाळासाहेब शिंदे,गोरख यादव, निलेश घाडगे,मोहन काळे इत्यादी पदाधिकाऱ्यांसह अन्य समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सत्कार कार्यक्रमा नंतर श्री मोहन गोरे यांनी कालकथित शब्बीरभाई अन्सारी आणि एजाज भाई यांच्या श्रद्धांजली चा ठराव मांडला आणि त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली

---------------

### गांजाचे पिक पिकवणाऱ्या

तात्याबा तुरुकमारे, वय-६० वर्षे रा. सुशी (वडगाव) ता-गेवराई, जि-बीड याचे मालकीचे शेतातील ज्वारीचे पिकामध्ये गांजा या अंमली पदार्थाची शेतात लावलेली ४२ झाडे मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन ५.८०० किग्रॅ गांजाची झाडे किंमत १,७४,०००/-रु चा मुद्देमाल ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन गेवराई येथे आणुन अटक केली आहे. सदर ईसमाविरुध्द कायद्यान्वये गुन्हा दाखल करुन गुन्ह्याचा तपास सुरु केला आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि लंके, सपोनि जंजाळ, प्रो.पोउपनि नागरे, गरजे पोलीस अंमलदार देवडे, भिसे, शिंदे, सोनवणे, सांगळे, ओव्हाळ, डोके तसेच फॉरेन्सीक पथक, कृषी व महसुल विभागाचे कर्मचारी यांनी केली.

--------------

### जनतेच्या दारी प्रशासन शिबिराचा

चंद्रकांत शेळके यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिराचे आयोजन करण्यात आले सदर शिबिरामध्ये माननीय तहसीलदार शेळके यांच्या हस्ते विविध लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे कामाचे प्रमाणपत्र शासनाच्या विविध योजना अंतर्गत लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटण्यात आले या योजनेचा प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचाव्यात यासाठी शासन कटिबद्ध आहे नागरिकांनी याचा सर्वातवरी फायदा घेऊन लाभ घ्यावा असे आवाहन माननीय शेळके साहेबांनी केले या शिबिरात सातबारा वाटप शिधापत्रिका वितरण गायरान मंजुरी संजय गांधी आणि श्रावण बाळ योजना अंतर्गत विविध कामे करून जागची जाग्यावर लाभार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले या प्रशासन शिफारत माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक लोढा चौसाळा चे सरपंच बाबू शेठजी लोढा उपसरपंच अंकुश कळाशे सतीश जोगदंड चंद्रकांत गोरे चेअरमन दत्तात्रेय नाईकवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती व परिसरातील विविध गावचे सरपंच उपसरपंच सोसायटीचे चेअरमन सर्व ग्रामपंचायतचे सदस्य महिला बचत गट शेतकरी गट अशा व अंगणवाडी कर्मचाऱ्या यांच्यासह व अनेक महिला व गरजू नागरिक उपस्थित होते सदर शिबिर यशस्वी करण्याकरता मंडळ अधिकारी डीडी जायभाय ग्राम महसूल अधिकारी शिवराम येळे चौसाळाचे तलाठी कमलेश निर्मळ निशा खांडेकर अविनाश माळवे तलाठी शेख पठाण आधी मंडळातील अधिकारी आवर्जून उपस्थित होते सदर शिबिर आयोजित केल्याबद्दल लाभार्थ्यांकडून संबंधित अधिकाऱ्यांना धन्यवाद देत आहे

-------------

### बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा

नुकसान झाले. त्या वेळी राज्य सरकारने परिस्थितीची दखल घेत बीड जिल्ह्याला 'विशेष प्रकरण' म्हणून जाहीर करत सर्व शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी १७ हजार रुपये मदत देण्याची घोषणा केली होती. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी अतिवृष्टीची परिस्थिती लक्षात घेऊन बीड जिल्ह्याला 'स्पेशल केस' म्हणून सरसकट १७ हजार रुपये प्रति हेक्टर विमा देण्याची घोषणा केली होती. मात्र, या घोषणेला अनेक महिने उलटूनही प्रत्यक्षात एकही रुपया शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेला नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. स्मरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे, तात्काळ १७ हजार रुपये प्रति हेक्टर विमा रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा, प्रशासनाने या मागणीची दखल न घेतल्यास ०१ मे रोजी राज्यभर ध्वजारोहणानंतर प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयासमोर टाळे ठोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे . शेतकरी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत शासनाने केलेली घोषणा तातडीने अमलात आणणे आवश्यक आहे. मात्र, प्रशासनाच्या ढिलाईमुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयाने हे स्मरणपत्र शासनाकडे तातडीने पाठविण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. आता शासन या मागणीवर कितपत लवकर निर्णय घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या निवेदनावर शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष भाई गंगाभिषण हनुमान भोसले , अमोल आंधळे, बाबासाहेब मस्के, रामदास गरकल आदींच्या सह्या आहेत.

--------------

### वन विभागाने आतापर्यंत

जैवविविधता वाढते.परंतु वन विभाग नुसते शासनाचे लाखो रुपये खर्च करून वृक्षारोपण करतय आणि वृक्षारोपण करताना फक्त फोटो काढुन त्यांची फक्त प्रोसेस पुर्ण करतय पुन्हा त्या कडे ढुंकूनही पाहत नाहीत.त्यामुळे गेल्या दहा वर्षात पाटोदा तालुक्यात वन विभागाने शासनाचे लाखो रुपये खर्च करून वृक्षारोपण करण्यात आले त्या मधील किती झाडे जिवंत आहेत त्याची उच्च स्तरीय चौकशी समिती नेमुन तपासणी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनतेतुन होत आहे.

--------------

### मुलींना त्रास देणाऱ्या

अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली पल्लवी जाधव, सहायक फौजदार मीरा रेडेकर, पोलीस हवालदार शोभा जाधव, चालक पोलीस शिपाई अक्षय जाधव सर्व दामिनी पथक बीड यांनी केली.

------------

### वाळुंजमध्ये बालसाहित्य संमेलनात प्रजक्ता

मने जिंकली. उद्घाटन सत्राचे आभार प्रा. सय्यद अल्लाउद्दीन यांनी मानले. काव्यवाचन सत्रात विद्यार्थ्यांनी स्वरचित कवितांचे प्रभावी सादरीकरण केले, तर कथाकथन सत्रात लहानग्यांनी कल्पनाशक्तीला वाव देत विविध कथा मांडल्या. सूत्रसंचालन कु. प्रांजल सरडे व कु. मृदुला शिंदे यांनी केले. यानंतर कवी हनुमंत चांदगुडे व कवी शंकर कसबे यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत कविता सादर केल्या व मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या प्रसंगी अनेक मान्यवर, शिक्षक, शिक्षिका, साहित्यिक, ग्रामस्थ, महिला, युवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संमेलन यशस्वी करण्यासाठी डॉ. हरिष हातवटे, सय्यद सल्लाउद्दीन, दत्तात्रय घोरपडे, सचिन वारंगुळे, राजामती घोलप, काझी शबनम आदींनी विशेष परिश्रम घेतले. एकूणच, वाळुंज येथे पार पडलेले हे बालसाहित्य संमेलन ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले असून साहित्य संस्कृतीच्या जतन व संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

--------

cmyk

## श्रीराम नवमीच्या निमित्ताने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे श्रीराम नवमीच्या निमित्ताने व स्व मेजर शिवराज खरबड यांच्या स्मरणार्थ आधार युवा मंचच्या वतीने उद्या हनुमान मंदिरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.युसूफवडगांव येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या आधार युवा मंचच्या वतीने गेल्या १४ वर्षांपासून ग्रामदैवत असलेले प्रभु श्रीराम यांच्या जन्मोत्सव व यात्रा महोत्सवाच्या निमित्ताने व स्व.मेजर शिवराज खरबड यांच्या स्मृती प्रित्यर्थ भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येते याही वर्षी श्रीराम नवमी व यात्रा महोत्सव दि.२६ मार्च पासुन असुन त्या निमित्ताने दि.२५ मार्च रोजी सकाळी ८ वाजता गावातील हनुमान मंदिरात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे तरी गावातील व पंचक्रोशीतील युवकांनी व इच्छुक रक्तदात्यांनी या सामाजिक उपक्रमात आपला सहभाग नोंदवुन सामाजिक बांधिलकी जोपासत या ठिकाणी येऊन रक्तदान करावे असे आयोजकांच्या वतीने रक्तदात्यांना आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



# शेतकऱ्यांची परिस्थती बिकट; मराठवाड्यासाठी विशेष पॅकेज द्या

## खा.बजरंग सोनवणे यांनी शेतकऱ्यांच्या मागणीसाठी संसद दणाणून सोडली

केज । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असून बीडसारख्या दुष्काळग्रस्त जिल्ह्यांसाठी विशेष आर्थिक पॅकेज, जलसंधारण प्रकल्प आणि तातडीच्या सिंचन उपाययोजना करा, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली.

खा.बजरंग सोनवणे यांनी तारांकित प्रश्न मांडत केंद्र सरकारचे लक्ष वेधले. शेतकऱ्यांच्या विषयी मागणी केल्यानंतर या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी बीड जिल्ह्याची स्थिती चिंताजनक असल्याचे मान्य केले. कमी पिक तीव्रता, घटती उत्पादकता आणि संस्थात्मक कर्जपुरवठ्याचा अभाव या प्रमुख समस्यांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर विपरीत



परिणाम होत असल्याची माहिती महाराष्ट्र सरकारने केंद्राला दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, शेतकऱ्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी केंद्र सरकारने २०२५ पासून पीएम धन-धान्य कृषी योजना सुरू केली असून देशातील १०० मागास कृषी जिल्ह्यांमध्ये बीडचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत ११ मंत्रालयांच्या ३६ योजना एकत्रितपणे राबवून जिल्हानिहाय कृती आराखडे तयार केले जात आहेत, असेही त्यांनी सांगीतले.

१ प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना अंतर्गत राज्यातील २९ मोठे व मध्यम प्रकल्पांना निधी देण्यात आला असला तरी बीड जिल्ह्याला थेट लाभ देणारे प्रकल्प अत्यल्प असल्याचे स्पष्ट झाले.२ अप्पर कुंडलिका प्रकल्पातून सुमारे २,८०० हेक्टर तर सत्रा पोट्रा लघु सिंचन प्रकल्पातून ७९० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येत आहे.३ महाराष्ट्रात मागील दोन वर्षे व चालू वर्षात तब्बल ६,६८४.८ कोटींची मदत देण्यात आल्याची माहितीही मंत्र्यांनी दिली. दुष्काळग्रस्त भागांसाठी केंद्र सरकारकडून विविध योजनांद्वारे उपाययोजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती अभियान, कडधान्य आत्मनिर्भरता मिशन, या सूक्ष्म सिंचन योजनेचा समावेश आहे. महाराष्ट्रात मागील पाच वर्षांत ७.६९ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यात आले असून, बीड जिल्ह्यात ३२,०५४ हेक्टर क्षेत्र जोडले गेल्याचेही कृषी मंत्र्यांनी सांगितले.मराठवाड्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी उजनी धरणातून मांजरा किंवा माजलगाव धरणाकडे पाणी वळवण्याचा कोणताही प्रस्ताव राज्य सरकारकडून केंद्राकडे आलेला नसल्याचे कृषीमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## महाराष्ट्र केसरी मध्ये सुमितकुमार विजेता: जुनिअर महाराष्ट्र केसरीचा बीडला मान



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील शेलापुरी या पुनर्वसित गावातील ऊसतोड कामगाराचा मुलगा पै. सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर याने महाराष्ट्र केसरी स्पर्धेत ७० किलो वजन गटात गादी विभागात सुवर्ण कामगिरी करत सुवर्ण पदक पटकावत महाराष्ट्र केसरी ७० किलो वजन गटात विजेता ठरला . महाराष्ट्र केसरी अधिवेशन वाघोली, पुणे मुक्कामी १८ ते २२ मार्च २०२६ या दरम्यान पार पडले.

यावेळी पै. सुमितकुमार भारस्कर यांनी पहिल्या ४ फेऱ्या १०-०० अश्या मोठ्या गुण फरकाने विजय मिळवत सेमी फायनल मध्ये पुणे शहरचा विपुल थोरात सोबत ०८-०५ अशी लढत करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत कोल्हापूर शहरातील सत्तपा हिरगुडे सोबत सुमितकुमारने ०६-०० अशा मोठ्या गुण फरकाने विजय मिळवून सुवर्ण पदक पटकावले. पै.सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर हा पुण्यातील मारुंजी येथे अमोल बुचडे कुस्ती अकादमीमध्ये कुस्तीचे प्रशिक्षण घेत आहे. त्याला रुस्तम-ए-हिंद, महाराष्ट्र केसरी पै. अमोल भाऊ बुचडे, नरेंद्र कुमार कोच, घुले सर, पै. समीर देसाई, गुंड सर, कांबळे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.तसेच या अभूतपूर्व येशामुळे माजलगाव सह बीड जिल्ह्याचा दबदबा महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अधोरेखित झाला असून, पै. सुमितकुमार भारस्कर याचे विविध सामाजिक माध्यमातून तसेच सर्व स्तरावरून शुभेच्छाचा वर्षावासह अभिनंदन होत आहे.

## पाटोदा तालुक्यातील मतदारांनो सावधान!

### मतदार यादीत नाव टिकवण्यासाठी आता 'माहेरचा पुरावा' आवश्यक

पाटोदा । प्रतिनिधी

निवडणूक आयोगाच्या 'एसआयआर' (विशेष सखोल पुनरीक्षण) कार्यक्रमांतर्गत आता मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण अत्यंत कडकपणे केले जात आहे. पाटोदा तालुक्यातील ज्या विवाहित महिलांची नावे २००२ च्या मतदार यादीत नाहीत किंवा ज्यांचे नाव सध्याच्या यादीत आहे, त्यांना आता आपल्या माहेरचा पुरावा सादर करावा लागणार आहे. अन्यथा, अशा मतदारांची नावे यादीतून वगळली जाण्याची शक्यता आहे.

प्रशासनाकडून सध्या २०२४ च्या मतदार यादीचे २००२ च्या यादीशी 'मॅपिंग' करण्याचे काम सुरू आहे. ज्या महिलांचे लग्न होऊन त्या पाटोदा तालुक्यात आल्या आहेत, त्यांच्या नावांची खातरजमा करण्यासाठी त्यांच्या माहेरच्या आई-वडिलांच्या २००२ च्या मतदार यादीतील नोंदी तपासल्या जात आहेत. नाव वाचवण्यासाठी हे '१४ पुरावे' ठेवा तयार: जर तुमचे नाव २००२ च्या यादीत सापडत नसेल, तर खालीलपैकी कोणतेही पुरावे तुम्ही सादर करू शकता: १. २००२ पूर्वीची मतदार यादी किंवा जुनी निवडणूक पावती. २. जमिनीचे किंवा मालमत्तेचे कागदपत्रे/७-१२ उतारा. ३. नागरिकत्व प्रमाणपत्र. ४. कायमस्वरूपी रहिवासी प्रमाणपत्र. ५. निर्वासित नोंदणी प्रमाणपत्र. ६. पासपोर्ट. ७. एलआयसी पॉलिसी. ८. शासकीय परवाना किंवा प्रमाणपत्र. ९. शासकीय किंवा निमशासकीय नोकरीचे कागदपत्र. १०. बँक किंवा पोस्ट ऑफिस खाते/पासबुक. ११. जन्म प्रमाणपत्र. १२. बोर्ड किंवा विद्यापीठाचे शैक्षणिक प्रमाणपत्र. १३. न्यायालयाच्या नोंदी. १४. रेशन कार्ड किंवा शासकीय ओळखपत्र. बीएलओ () कडे होणार तपासणी पाटोदा तालुक्यातील प्रत्येक गावात बीएलओमार्फत हे सर्वेक्षणाचे काम केले जात आहे. ज्यांच्याकडे कागदपत्रे नसतील त्यांना नोटीस दिली जाईल आणि तीन वेळा संपर्क करूनही प्रतिसाद न मिळाल्यास नाव रद्द करण्याची प्रक्रिया केली जाईल.

## श्रीराम जन्मोत्सवानिमित्त चिंचवणमध्ये अक्षय महाराज पिंगळे यांचे किर्तन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचवण येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या धार्मिक कार्यक्रमास परिसरातील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपा युवा मोर्चाचे वडवणी तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे यांनी केले आहे.

चिंचवण येथील तांबडे कुटुंबियांच्या वतीने गेल्या सुमारे ६० वर्षांपासून श्रीराम जन्मोत्सवाची परंपरा अखंडपणे जपली जात असून या धार्मिक परंपरेतून गावात भक्तीमय वातावरण निर्माण होत आहे. दरवर्षी मोठ्या उत्साहात हा सोहळा साजरा केला जातो. यावर्षीही तांबडे कुटुंबियांनी परंपरा कायम ठेवत श्रीराम मंदिर चिंचवण येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. दि.२६ मार्च २०२६ गुरूवार रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. युवाप्रेरक अक्षय महाराज पिंगळे (बीड) यांचे हरिकिर्तन होणार आहे. त्यांच्या कीर्तनातून श्रीराम भक्तीचा संदेश देण्यात येणार असून त्यानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास डोंगरपट्टा व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हरिकिर्तनाचा तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपा युवा मोर्चाचे वडवणी तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे यांनी केले आहे. तसेच या कार्यक्रमाच्या तयारीसाठी गावातील ग्रामस्थ आणि तांबडे कुटुंबियांचे सदस्य सक्रियपणे सहभाग घेत असून धार्मिक वातावरणात हा सोहळा उत्साहात पार पडणार असल्याचे सांगण्यात आले.

## वडवणी तालुक्यात भाजपची कार्यकारिणी जाहीर

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात भारतीय जनता पक्षाची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, पक्ष संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने विविध पदांवर पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही कार्यकारिणी ना. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, माजी आमदार केशवराव आंधळे, जिल्हाध्यक्ष शंकर शंकर देशमुख त तसेच युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे यांनी जाहीर केली.

यामध्ये महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी ज्योत्स्नाताई बालासाहेब बादाडे यांची निवड करण्यात आली असून, किसान मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी बालासाहेब शेंडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तालुका कार्यकारिणीत भागवत चोले, रामधन नागरगोजे, सुधाकर मस्के, गणेश आजबे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. बापू बापू मुंडे, सतीश पवार व प्रताप सावंत यांची सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली असून भगवान मुंडे यांच्याकडे कोषाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

सचिवपदी आप्पा चव्हाण, रमेश डोंगरे आणि आदिनाथ तोंडे यांची निवड झाली आहे. तसेच भाजपच्या फादर बॉडीमध्येही विविध पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. उपाध्यक्षपदी नवनाथ तुरे, इंदरराव मुंडे, नारायण काळे, मुकुंद सुरवसे, देविदास चोले, गणेश टकले यांची निवड करण्यात आली. सरचिटणीसपदी गणेश जाधव, राम नागवे, नवनाथ लंबाटे, दादासाहेब तोगे, विलास आंधळे आणि चंद्रकांत चोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कोषाध्यक्षपदी शिवाजी देवकते यांची निवड झाली आहे. सचिवपदी शाम यादव, गोविंद अंबुरे, दत्ता गोंडे, नागुराव राठोड, दिप कि आजबे, बालासाहेब राऊत आणि लक्ष्मण मुंडे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून अर्जुन मुंडे, विठ्ठल शिंदे, बळी करडकर, सत्यप्रेम बडे आणि महादेव खराडे यांचा समावेश करण्यात आला आहे. नवीन कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर वडवणी तालुक्यातील पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, आगामी काळात पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी ही कार्यकारिणी महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## शाळेच्या परिसरात वराहाचा मुक्त संचार

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील बीड सांगवी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात वराहाचा मुक्त संचार आणि शौचालयाची वाढल्याने विद्यार्थी पालक शिक्षक मॅडम भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे बीड सांगवी गावामधे दारुड्या प्रमाण जास्त आहे त्यामुळे विद्यार्थी शिक्षक मॅडम शौचालयाची सोय नसल्याने मुळे भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे . शाळेच्या परिसरात मोठ्या प्रमाणात घाण साचत असल्याने वराहाचे प्रमाणात दिवसेंदिवस वाढत चालली आहे यामुळे शाळेचं वातावरण असुरक्षित बनले आहे विशेषत म्हणजे या शाळेच्या परिसरात बाजूंनी दारुड्या येजा करतं असतात त्यामुळे विद्यार्थी शिक्षक मॅडम शौचालयाची व्यवस्था नसल्याने मुळे पत्रा आडसा करावा लागतो मुलींना शिक्षक मॅडम शौचालयाचा त्रास सहन करावा लागतो .

आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात बाजूंनी कंपाऊंड गरजेचे आहे.यामुळे विद्यार्थी भिंतीचे छायेत येत असल्याने चित्र दिसुन येत आहे विद्यार्थी मुलींना शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे मुलींना शौचालयाची सोय नसल्याने मुळे सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे या शाळेच्या मुलीला आणि शिक्षक मॅडम शौचालयाची व्यवस्था व कंपाउंड ची बंदोबस्त करावा अशी मागणी पालक शिक्षक मॅडम शिक्षक करण्यात येतं आहे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात दुष्टीने तातडीने उपाययोजना करण्याची गरज प्रशासनाने गरजेचे आहे

## जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग, माजलगावचा १०० टक्के निकाल

माजलगाव । प्रतिनिधी

: महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यातर्फे नुकत्याच जाहीर झालेल्या पोस्ट बेसिक बीएससी नर्सिंग. अंतिम वर्षाच्या परीक्षेत माजलगाव विकास प्रतिष्ठान संचलित जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग, माजलगाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लावला आहे. महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचने हे घवघवीत यश मिळवल्याने संस्थेसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या परीक्षा उत्तीर्ण होत आपले शैक्षणिक प्रशिक्षण पूर्ण केले असून ते आता समाजातील रुग्णांच्या सेवेसाठी सज्ज झाले आहेत. ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचने मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद मानले जात आहे.या यशानिमित्त महाविद्यालयात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. व पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशामागे महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन, शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थ्यांची मेहनत कारणीभूत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा मंगलाताई प्रकाश सोळंके यांनी विद्यार्थ्यांचे आणि त्यांना घडविणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच आरोग्यसेवेच्या क्षेत्रात संवेदनशीलता, कौशल्य आणि समर्पणाने काम करण्याचे आवाहनही केले.जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग या उल्लेखनीय यशामुळे माजलगाव शहरासह बीड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल झाले आहे. पुढील काळातही अशाच प्रकारे गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन आरोग्य क्षेत्रासाठी सक्षम आणि कुशल नर्सिंग स्टाफ घडविण्याचा संस्थेचा संकल्प असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य विनोथ कुमार सर, व्हॉइस प्रिन्सिपल प्रवीण कुमार सर , ऑफिस सुप्रीटेंडंट वाघ सर, शिंदे सर, इरफान पठाण सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## श्रीराम नवमी निमित्त रामगड येथे यात्रोत्सव-महंत स्वामी योगीराज महाराज

बीड । प्रतिनिधी

प्रभू श्रीरामाच्या पावन पदस्पर्शाने पवित्र झालेल्या बीड तालुक्यातील श्री क्षेत्र रामगड संस्थान येथे श्रीराम नवमी निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य एकदिवसीय यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रोत्सवासाठी पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्त मोठ्या उत्साहाने उपस्थित रहावे असे आवाहन गडाचे महंत स्वामी योगीराज महाराज यांनी केले आहे.

रामगड हे धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व असलेले ठिकाण असून येथे प्रभू श्रीराम, लक्ष्मण व माता सीता यांच्यासह विठ्ठल-रुक्मिणीचेही मंदिर आहे. त्यामुळे या गडाला विशेष धार्मिक अधिष्ठान लाभले असून वर्षभर भाविकांची वर्दळ येथे पाहायला मिळते. श्रीराम नवमीच्या दिवशी येथे विशेष पूजाअर्चा, धार्मिक कार्यक्रम आणि कीर्तनाचा सोहळा पार पडतो. यंदा गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत गडाचे महंत स्वामी योगीराज महाराज यांचे काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्यांच्या कीर्तनातून श्रीरामाच्या जीवनचरित्राचा, आदर्शांचा व भक्तीचा संदेश भाविकांना मिळणार आहे. कीर्तनानंतर तात्काळ महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी याचाही लाभ घ्यावा. महाप्रसादाचे यजमान खासदार बजरंग सोनवणे आहेत. रामगड संस्थानतर्फे सर्व रामभक्तांना यात्रोत्सवात सहभागी होऊन कीर्तनाचा तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दादेगाव येथे श्रीराम नवमी आणि समर्थ जन्मोत्सव सुरु

### समर्थभक्त मंदार महाराज रामदासी यांच्या 'संगीत श्रीराम कथेस प्रचंड प्रतिसाद

आष्टी । प्रतिनिधी

सद्गुरू श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि समर्थशिष्य श्री देवदास स्वामी यांचे समाधीस्थान असलेल्या आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र दादेगाव (रामाचे) येथे सलग ३७८ वर्षांची महान परंपरा असलेला 'श्रीरामनवमी आणि श्रीसमर्थ जन्मोत्सव' मोठ्या भक्तीमय वातावरणात सुरू आहे.दि.१९ ते २७ मार्च या कालावधीत चालणाऱ्या या महोत्सवामुळे संपूर्ण दादेगाव परिसरात उत्साहाचे वातावरण आहे.

समर्थभक्त मंदार महाराज रामदासी यांच्या 'संगीत श्रीराम कथेस प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. आष्टी तालुक्यातील दादेगावच्या गावकऱ्यांनी या महोत्सवाचे भव्य आयोजन केले आहे.धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आणि श्री समर्थ रामदास स्थापित श्रीमदादेव



समासा तसेच श्रीराम पंचायतन देवस्थानच्या वतीने हा सोहळा दरवर्षीप्रमाणे यंदाही दिमाखात पार पडत आहे.महोत्सवातील प्रमुख आकर्षणे आणि कार्यक्रम भाविकांसाठी या सप्ताहात विविध भरगच्च धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोज.१९ ते २५ मार्च दरम्यान दररोज सायंकाळी ३.३० ते ७ या वेळेत समर्थभक्त मंदार महाराज रामदासी यांच्या सुश्राव्य वाणीतून 'संगीत श्रीराम कथा' गुंजत आहे.याला गायक गणेश मराठे,गणेश बैरागी,प्रणव देशपांडे यांची सुरेल साथ लाभत आहे.हर्षद भावे हे तबल्यावर साथसंगत करत आहेत.आज बुधवार दि.२५ मार्च रोजी सायंकाळी गंगापूजन,कावड मिरवणूक,अश्व मिरवणूक आणि भव्य छबिना काढण्यात येणार आहे.गुरुवार दि.२६ मार्च रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली मुगगावकर यांचे श्रीराम जन्माचे कीर्तन होणार आहे. दि.२६ मार्च दुपारी ३ ते ७ या वेळेत तरुणाईच्या आकर्षणाचे केंद्र असलेला 'कुस्त्यांचा भव्य हगामा' जंगी आखाडा रंगणार आहे.शुक्रवार दि.२७ मार्च रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत समर्थभक्त मंदारबुवा रामदासी यांच्या लळीताच्या कीर्तनाने या भव्य महोत्सवाची सांगता होणार आहे. महोत्सव काळात श्रीराम मंदिरात दररोज पहाटेपासून ते रात्रीपर्यंत भक्तीचा अखंड गजर सुरू असतो.पहाटे ५.३० ते ६ काकड आरती, सकाळी ७ ते ९ श्रीराम पंचायतन महापूजा, सकाळी ९ ते १० पालखी सोहळा, सकाळी १ ते १२ श्रीरामरक्षा स्तोत्र पठण व 'श्रीराम जय राम जय जय राम' मंत्रजप, दुपारी १२ ते २ महाप्रसाद (अन्नदान), सायंकाळी ७ ते ७.३० महाआरती, सायंकाळी ७.३० ते ८.३० पालखी सोहळा व श्रीमद दासबोध वाचन,रात्री ९ ते ११ महाप्रसाद वाटप केला जातो.या संपूर्ण सोहळ्याचे पौरोहित्य सोनुदेवा कुलकर्णी (पुजारी), प्रविण इनामदार, संतोष देशपांडे, सचिन सावरीकर आणि गणेश कुलकर्णी हे गुरुजी करत आहेत. दास म्हणे रघुनाथाचा गुण घ्यावा,या भावनेने सर्व ग्रामस्थांनी आणि पंचक्रोशीतील भाविकांनी या सोहळ्याला उपस्थित राहून दर्शनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## भगव्या रंगात रंगणार पाटोदा; विराट हिंदू संमेलनाची पाटोद्यात जोरदार तयारी

पाटोदा । प्रतिनिधी

सकल हिंदू समाज,पाटोदा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विराट हिंदू संमेलनाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण पाटोदा शहर भगव्या रंगात न्हाऊन निघत असून वातावरणात धार्मिक उत्साहाची लाट उसळली आहे. येत्या गुरुवारी, दि. २६ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या या भव्य संमेलनासाठी शहरात जोरदार तयारी सुरू असून सर्वत्र भगवे ध्वज आणि आकर्षक सजावट करण्यात येत आहे.श्रीराम मंदिर व काळा हनुमान मंदिर परिसरात सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत होणाऱ्या या संमेलनात नामांकित शिवचरित्रकार अशोक बांगर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे. त्यांच्या विचारांतून हिंदू संस्कृती, इतिहास आणि एकतेचा संदेश दिला जाणार आहे.तसेच ह.भ.प. राधाताई महाराज आईसाहेब या मातृशक्ती प्रबोधन करणार असून समाजातील महिलांच्या सशक्त भूमिकेवर भाष्य करतील. ह.भ.प. लक्ष्मण महाराज सस्ते आणि ह.भ.प. केदारेश्वर महाराज जाधव हे प्रबोधनातून अध्यात्मिक व सामाजिक संदेश देणार आहेत.कार्यक्रमानंतर दुपारी १२ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत काढण्यात येणारी भव्य मिरवणूक ही संमेलनाची मुख्य आकर्षण ठरणार आहे. ढोल-ताशांचा गजर,भगवे झेंडे,धार्मिक घोषणांनी पाटोदा शहर दणाणून जाणार आहे.या संमेलनाच्या माध्यमातून ''हिंदू सारा एक'' हा संदेश समाजात रुजवण्याचा प्रयत्न करण्यात येत असून सामाजिक एकजूट आणि धार्मिक जागृती निर्माण करण्याचा आयोजकांचा उद्देश आहे.या भव्य सोहळ्यासाठी पाटोदा व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

cmyk

# सीसीआय खरेदीत मोठा घोटाळा?

## शेतकऱ्यांच्या नावावर व्यापाऱ्यांचा डल्ला

पुणे : खरीप आणि रब्बी हंगामातील पिकांची शासकीय हमीभावाने खरेदी सुरू असताना, अनेक ठिकाणच्या भारतीय कापूस महामंडळ खरेदी केंद्रांवर (सीसीआय) अनियमिततेच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. काही खासगी व्यापारी शेतकऱ्यांच्या नावाचा गैरवापर करून बोगस ऑनलाइन नोंदणीद्वारे आपला माल केंद्रांवर विकत असल्याचा संशय व्यक्त होत असून, यामुळे प्रत्यक्ष शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे.

शासकीय खरेदी प्रक्रियेत कापूस, ज्वारी आणि मका यांसाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य आहे. मात्र, ज्या शेतकऱ्यांच्या शेतात संबंधित पिकांचा पेराच नाही, अशांच्या नावावर खोटा पेरा दाखवून काही व्यापारी नोंदणी करत असल्याची चर्चा आहे. याच माध्यमातून बोगस व्यवहार करून केंद्रांवर माल खपवला जात असल्याचे सांगितले जात आहे. सिमा रेषेवरील कापूस जिनिंगमध्ये तेलंगणा राज्यातील निकृष्ट दर्जाचा कापूस खरेदी करण्यात आल्याची चर्चा रंगली आहे. स्थानिक शेतकऱ्यांना हाताशी धरून व्यापाऱ्यांनी ही साखळी तयार केल्याचा आरोप होत आहे. यामुळे स्थानिक शेतकऱ्यांचा माल विक्रीसाठी अडकून पडत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. काही प्रकरणांमध्ये शेतात प्रत्यक्ष पिक नसतानाही कागदोपत्री उत्पादन दाखवून खरेदी केंद्रावर माल विक्रीसाठी आणला जात असल्याचे शेतकरी सांगत आहेत. यामुळे खरी गरज असलेल्या शेतकऱ्यांना नोंदणी आणि विक्रीसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

परिणामी, हमीभाव योजनेचा लाभ चुकीच्या लोकांकडे वळत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर ऑनलाइन नोंदींची काटेकोर पडताळणी करण्याची गरज निर्माण झाली आहे. बोगस नोंदणी रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. अन्यथा, हमीभाव योजनेचा उद्देशच धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सीसीआय खरेदी केंद्रांवरील संभाव्य गैरव्यवहारामुळे खरी शेतकरीवर्ग अडचणीत येत असल्याचे चित्र आहे. पारदर्शकता आणि कडक अंमलबजावणी केल्यासच शासकीय हमीभाव योजनांचा खरा लाभ गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू शकतो.




### प्रशासनाला आमदाराचा इशारा

या प्रकरणाची महसूल आणि कृषी विभागामार्फत चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. याबाबत आमदार भीमराव केराम यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर बोगस नोंदणी किंवा परराज्यातील कापूस खरेदी झाल्याचे सिद्ध झाले, तर संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल. शेतकऱ्यांच्या हक्कावर गदा आणणारा कोणताही प्रकार सहन केला जाणार नाही.

# मूग, तूर, हरभरा साठवण्याची योग्य पद्धत

कडधान्य साठवणुकीदरम्यान किडींचा प्रादुर्भाव होणे ही शेतकऱ्यांसाठी मोठी अडचण ठरते. अनेक वेळा शेतात चांगले उत्पादन घेऊनही साठवणुकीत योग्य काळजी न घेतल्यामुळे मोठे नुकसान होते. कडधान्याला लागणारी कीड ही केवळ साठवणुकीत निर्माण होत नाही, तर तिची सुरुवात पिक शेतात असतानाच होते.

शेतातून कशी होते कडधान्याला कीड : पीक परिपक्व झाल्यानंतर भुंगेरे शेंगा किंवा दाण्यांवर अंडी घालतात. कापणी व मळणी करताना ही अंडी किंवा अळ्या धान्यासोबत साठवणुकीत जातात. साठवणुकीदरम्यान अंडी उबून अळ्या बाहेर येतात आणि त्या दाण्यांच्या आत शिरून त्यावर उपजीविका करतात. त्यामुळे दाणे आतून पूर्णपणे पोखरले जातात आणि खाण्यायोग्य राहत नाहीत. साठवणुकीच्या ठिकाणी असलेल्या भेगा, फटी, जुनी पोती, गोदामाचे कोपरे यामध्ये हे भुंगेरे लपून राहतात. नवीन धान्य साठवले की हे किडे लगेच त्यावर हल्ला करतात. तसेच बैलगाडी, ट्रेलर, ट्रॅक्टर ट्रॉली अशा वाहतुकीच्या साधनांमधूनही या किडींचा प्रसार होतो. त्यामुळे साठवणूक जागा स्वच्छ नसल्यास किडींचा धोका अधिक वाढतो. इतर धान्यांच्या तुलनेत कडधान्यांना किडींचा प्रादुर्भाव जास्त होतो. मूग, उडीद, तूर, हरभरा, चवळी, वाटाणा या कडधान्यांवर भुंगेऱ्यांचा विशेष हल्ला दिसून येतो.



असे होते नुकसान : कॅलासोब्रुकस जातीचा भुंगेरा हरभरा व चवळीमध्ये प्रचंड नुकसान करतो. मादी भुंगेरा साधारणतः ८० ते ९० अंडी एकेक करून दाण्यावर घालतो. अंडी ४ ते ५ दिवसांत उबतात. अळी अवस्था १५ ते २० दिवसांची असते, तर कोषावस्था दाण्याच्या आतच ४ ते ८ दिवसांत पूर्ण होते. पूर्ण वाढलेला भुंगेरा दाण्यात छिद्र पाडून बाहेर येतो.प्रौढ भुंगेरा सुमारे १० दिवस जिवंत राहतो. त्याला पंख असल्यामुळे तो कोठारातून उडून पुन्हा शेतात जातो आणि कापणीपूर्वी किंवा कापणीनंतर पुन्हा अंडी घालतो. त्यामुळे किडींचा जीवनचक्र सतत सुरू राहतो.

कीड लागू नये म्हणून अशी घ्या काळजी : कडधान्य शेतात असतानाच योग्य काळजी घेणे फार महत्वाचे आहे. कापणीनंतर धान्यातील ओलावा अनेकदा १५ टक्क्यांपेक्षा जास्त असतो. त्यावेळी तापमान साधारण ३० अंश सेल्सिअस आणि हवेतील आर्द्रता ७५ टक्क्यांपेक्षा जास्त असते. हे वातावरण कीड आणि बुरशी वाढीसाठी अतिशय पोषक असते. त्यामुळे तूरसारखी कडधान्ये टणक होतात आणि शिजण्यास वेळ लागतो. तूर पेंड्या शेतात किंवा खळ्यात उभ्या करून, थोड्या सैल बांधून ठेवाव्यात.

त्यामुळे हवा खेळती राहते आणि धान्य लवकर वाळते. उडीद, मूग, चवळी यांसारखी पिके ज्या पेंड्या बांधता येत नाहीत, ती कोरड्या व उंच जागी पसरून ठेवावीत आणि वेळोवेळी उलटणी करावी.खरीप हंगामात मूग व उडीद कापणीवेळी वातावरण ओलसर असल्याने नुकसान जास्त होते. ते टाळण्यासाठी शेतात गरजेनुसार ओटे तयार करून त्यावर तात्पुरते तंबू किंवा प्लास्टिक आच्छादन करणे उपयुक्त ठरते. योग्य साठवणूक व काळजी घेतल्यास कडधान्याचे मोठे नुकसान टाळता येते.

# रेनबो रुस्टर प्रजातीची कोंबडी; अंडी,मांस उत्पादनासाठी सर्वोत्तम!

राज्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कोंबडीपालन व्यवसाय केला जातो. यात काही शेतकरी हे ब्रॉयलर कोंबड्यांच्या माध्यमातून पोल्ट्री उभारतात. तर काही शेतकरी हे ग्रामीण भागातील चांगल्या जातींच्या माध्यमातून गावठी कोंबड्यांचे पालन करतात. विशेष म्हणजे या ग्रामीण भागातील कोंबड्यांकडे फारसे लक्ष देण्याची गरज नसते. तसेच त्यांच्या अंड्यांना मिळणारा दरही अधिक असतो. ग्रामीण भागात अनेक शेतकरी हे कोंबडीपालन व्यवसाय करण्याच्या विचारात असतात. मात्र, कोणत्या प्रजातीच्या कोंबड्यांची निवड करावी? असा प्रश्न त्यांच्यासमोर असतो. भारतामध्ये सर्वाधिक पाळल्या जाणाऱ्या 'रेनबो रुस्टर' या प्रजातीच्या कोंबडी अंडी, मांस उत्पादनासाठी सर्वोत्तम मानली जाते.

वर्षभरात किती अंडी मिळतात? : पोल्ट्री व्यवसायाच्या माध्यमातून अंडी उत्पादनासाठी 'रेनबो रुस्टर' ही सर्वोत्तम प्रजाती मानली जाते. विशेष म्हणजे अंडी उत्पादनासोबतच कोंबडीची ही जात मांस उत्पादनासाठी वजनामध्ये देखील उत्तम ठरते. 'रेनबो रुस्टर' प्रजातीच्या पूर्ण वाढ झालेल्या एका कोंबडीचे वजन हे २.४ ते २.६ किलो इतके असते. या जातीची कोंबडी ही वर्षभरात सरासरी १२० अंडी देते. अन्य कोणत्याही लोकल जातीच्या तुलनेत कोंबडीची ही जात खूपच परिपक्व असते. एखादी स्थानिक कोंबडी १.२ ते १.५ किलोपर्यंत वाढते. तर ती वर्षाला ५० ते ६० अंडी देते. त्या तुलनेत 'रेनबो रुस्टर' ही कोंबडीची जात दुपटीने अंडी आणि मांस उत्पादन शेतकऱ्यांना मिळवून देते.


मिळते दुहेरी उत्पन्न : पशुतज्ज्ञांच्या माहितीनुसार, पोल्ट्री फार्मिंग व्यवयसायात उतरताना कोंबडीच्या जात निवडीवर अधिक भर देणे गरजेचे असते. ग्रामीण भागात अनेक शेतकरी छोटेखानी शेड उभारून, त्या माध्यमातून अंडी उत्पादन घेत असतात. यात प्रामुख्याने शेतकरी त्या-त्या भागातील स्थानिक कोंबड्यांच्या जातींची निवड करतात. मात्र, शेतकऱ्यांना अधिक अंडी आणि मांस उत्पादन मिळावे. यासाठी देशभरात 'रेनबो रुस्टर' या जातीच्या आधुनिक प्रजातीच्या कोंबड्यांची संख्या वाढवण्यावर भर देण्यात आला. ज्यामुळे शेतकऱ्यांना छोटेखानी पोल्ट्री उभारून, दुहेरी उत्पन्न मिळण्यास फायदा झाला आहे.

वनराज कोंबडीही देते अधिक अंडी : विशेष म्हणजे 'रेनबो रुस्टर' ही कोंबडीची आधुनिक प्रजाती असून, तिच्यापासून शेतकऱ्यांना दुहेरी फायदा मिळतो. रेनबो रुस्टर प्रजाती स्थानिक प्रजातीपेक्षा अधिक अंडी देते. तर केवळ सहा महिन्यात ती १.५ किलोपर्यंत वजन देते. तर वनराज जातीची कोंबडी ही वर्षभरात १५० अंडी देण्यास सक्षम असते. अर्थात शेतकऱ्यांना स्थानिक प्रजातीच्या तुलनेत अंडी उत्पादनासाठी 'रेनबो रुस्टर' आणि वनराज ही प्रजाती उत्तम ठरते.



# कांदा उत्पादनात २३ टक्क्यांची घट

देशातील कांद्याची लागवड जवळपास स्थिर असताना उत्पादन मात्र ११ टक्क्यांनी घटले आहे. महाराष्ट्रात २३ टक्के, तर गुजरातमधील कांदा उत्पादनात २९ टक्क्यांची घट झाली आहे, असे केंद्रीय कृषी मंत्रालयाने वर्तवलेल्या अंदाजातून स्पष्ट झाले आहे. अतिवृष्टी, बदलते वातावरण आणि कीड-रोगांमुळे उत्पादकता घटली आहे, अशी माहिती कांदा उत्पादकांनी दिली. केंद्रीय कृषी विभागाने नुकताच २०२५-२६ च्या हंगामातील उत्पादनाचा पहिला सुधारित अंदाज जाहीर केला आहे. या अंदाजात देशातील कांदा उत्पादनात गेल्या वर्षीच्या तुलनेत ११.३ टक्क्यांनी घट झाल्याचे म्हंटले आहे. विशेष म्हणजे, देशातील कांदा लागवड मात्र केवळ अर्धा टक्क्याने कमी झाली आहे. हा आकडा ४ हजार हेक्टर इतका आहे.



देशात २०२४-२५ मध्ये १९ लाख ६८ हजार हेक्टरवर कांदा लागवड झाली होती. तर २०२५-२६ मध्ये १९ लाख ६४ हजार हेक्टरवर कांदा लागवड झाली आहे. म्हणजेच कांदा लागवडीतील वार्षिक घट नगण्य आहे. पण उत्पादनात झालेली घट जास्त आहे, असे कृषी विभागाच्या अंदाजावरून स्पष्ट होते. देशातील कांदा उत्पादकता विविध कारणांनी यंदा घटली आहे. त्यामुळेच कांद्याच्या एकूण उत्पादनात घट दिसून आली आहे. गेल्या वर्षी देशातील कांदा उत्पादन ३०७ लाख टनांवर पोचले होते. तर यंदा उत्पादनात ११.३ टक्क्यांची घट आली असून उत्पादन २७३ लाख टनांवरच स्थिरावले आहे, असा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे. कांदा उत्पादनातील घटीचा विचार करता महाराष्ट्रातील कांदा उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल २३ टक्क्यांनी कमी झाले आहे. राज्यातील कांदा लागवड मात्र केवळ अडीच टक्क्यांनी कमी झाली होती. गेल्या वर्षी राज्यात ९ लाख ७८ हजार हेक्टरवर कांदा लागवड झाली होती. तर यंदा ९ लाख ५४ हजार हेक्टरवर कांदा पीक होते.

मात्र कांदा उत्पादन गेल्यावर्षी १३५ लाख टन होते, ते यंदा १०४ लाख टनांवरच स्थिरावले आहे. महाराष्ट्र कांदा उत्पादनात आघाडीवर आहे. गेल्यावर्षी देशातील एकूण कांदा उत्पादनापैकी महाराष्ट्रात तब्बल ४४ टक्के उत्पादन झाले होते. पण यंदा महाराष्ट्राचा एकूण उत्पादनातील टक्काही कमी झाला असून ३८ टक्क्यांपर्यंत आला आहे. महाराष्ट्रासोबतच देशातील कर्नाटक, गुजरात, पश्चिम बंगाल मध्ये कांदा उत्पादन घटले आहे. तर मध्य प्रदेश, राजस्थान, बिहार, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, तमिळनाडू, हरियाना, झारखंड, तेलंगणा या राज्यांमधील उत्पादनात वाढ झाली आहे. गुजरातमधील उत्पादनात सर्वाधिक २९ टक्क्यांची घट झाली आहे. गुजरातमधील उत्पादन २५ लाख ४० हजार टनांवरून कमी होऊन १८ लाख टनांवरच स्थिरावले आहे. कर्नाटकातील उत्पादन जवळपास १८ टक्क्यांनी कमी होऊन २१ लाख २० हजार टनांवर स्थिरावले आहे. तर मध्य प्रदेशातील कांदा उत्पादनात ८.३७ टक्क्यांची वाढून होऊन उत्पादन ४८ लाख १५ हजार टनांवर पोचले आहे. राजस्थानधील उत्पादनही ४ टक्क्यांनी वाढून १६ लाखांवर पोचले आहे, असेही कृषी विभागाने आपल्या अंदाजात म्हटले आहे.

कांदा उत्पादकता घटण्याची कारणे :

काही भागांत विविध कारणांनी लागवडीचा कालावधी हुकला. पाऊस आणि अतिवृष्टीचा पिकाला फटका. बदलत्या वातावरणाचा वाढीवर परिणाम. रब्बीत पोषक वातावरणाअभावी आकारावर परिणाम. एकाच जमिनीत सतत कांदा पिकाचीच लागवड. सिंचनाअभावीही उत्पादकतेत घट. काही भागांत कीड-रोगांचा प्रादुर्भाव. निकृष्ट बियाण्यामुळे उगवण आणि वाढीवर परिणाम.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७५७ : प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी बंगालच्या नबाबाचा पराभव केला. या विजयामुळे ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा पाया घातला गेला आणी ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने कोलकाता काबीज केले.
१७८८ : 'कलकत्ता गॅझेट' या वृत्तपत्रामध्ये भारतीय बंगाली भाषेतील पहिली जाहिरात प्रकाशित करण्यात आली.
१८०७ : गुलाम व्यापार कायदा करून ब्रिटिश साम्राज्य मध्ये गुलामांचा व्यापार बंद करण्यात आला.
१८०७ : इंग्लंड देशांमध्ये प्रथम रेल्वे प्रवासी सेवा सुरू करण्यात आली.
१८८१ : लोकमान्य टिळकांनी संपादित केलेल्या 'मराठा' या दैनिकाची सुरूवात झाली.
१८८५ : पुणे यथे फर्ग्युसन महाविद्यालय सुरू झाले.
१८९८ : शिवराम परांजपे यांनी साप्ताहिक 'काळ' चा पहिला अंक काढला.
१८९८ : स्वामी विविकानंद यांनी भगिनी निवेदिता यांना ब्रह्मचर्याची दीक्षा दिली होती.
१९०५ : मांचुरियातील पोर्ट ऑर्थर सिटी येथील लढाईत जपानी सैन्याने रशियाचा पाडाव केला. आशियाई देशाने युरोपातील देशाचा केलेला पराभव ही त्या काळातील अतिशय महत्त्वाची घटना होती.
१९२९ : लाहोर काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन सुरू झाले.
१९३६ : मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची स्थापना
१९४२ : दुसरे महायुद्ध जपानी फौजांनी मनिला, फिलिपाइन्सवर ताबा मिळवला.
१९४५ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी न्यूरेम्बर्ग, जर्मनी येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१९५४ : राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी 'भारतरत्न' पुरस्कारांची स्थापना केली.
१९८९ : मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार सफदर हश्मी यांची नवी दिल्ली येथे पथनाट्य करत असतानाच निर्घृण हत्या
१९९७ : जगदीश शरण वर्मा यांनी भारताचे २७ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९८ : डॉ. सरोजिनी बाबर यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वसंत गोवारीकर यांच्या हस्ते सन्माननीय डी. लिट. पदवी प्रदान
२००० : १७ वर्षीय जलतरणपटू रुपाली रेपाळे हिने दक्षिण आफ़्रिकेतील रॉबेन आयलंड खाडी पोहून पार केली. ही खाडी पोहणारी ती वयाने सर्वात लहान जलतरणपटू आहे.
२००० : पनामा सरकारने ८५ वर्षांच्या कालखंडानंतर पनामा कालव्याचा पूर्ण ताबा घेतला.
२००० : संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा असलेल्या चलनी नाण्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते प्रकाशन.
२०१३ : मणिपूर उच्च न्यायालयाची स्थापना
२०१३ : मेघालय या केंद्रशाशित प्रदेशाची राजधानी शिलांग येथे उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली.
२०१७ : राजस्थान राज्याच्या बिकानेर शहरातील महिला तनुश्री परीक यांनी भारत देशाच्या सीमा सुरक्षा बल(बीएसएफ) च्या महिला अधिकारी बनून आपल्या देशाचे व राज्याचे नाव उज्वल केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९६ : सुप्रसिध्द कादंबरीकार र.वा. दिघे.
१८३८ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या संस्थापक सदस्यांमधील एक सर विल्यम वेदरबर्न यांचा जन्मदिन. त्यांनी सन १८८९ साली काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविले आहे.
१९१४ : अमेरिकन कृषी शास्त्रज्ञ व हरित क्रांतीचे जनक नॉर्मन अर्नेस्ट बोरलॉग यांचा जन्मदिन
१९१८ : ब्रिटीश भारतीय सैन्य दलाचे अधिकारी कर्नल प्रेम कुमार सहगल यांचा जन्मदिन
१९२० : आयझॅक असिमॉव्ह अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथालेखक (मृत्यू: ६ एप्रिल१९९२)
१९३२ : व.पु. काळे, मराठी साहित्यिकगव्हाची पीक देणारी जात शोधून काढणारे शास्त्रज्ञ नॉर्मल बोरलॉग
१९३२ : हरचंदसिंग लोंगोवाल अकाली दलाचे अध्यक्ष (मृत्यू: २० ऑगस्ट १९८५)
१९३३ : अंतराळ संशोधक वसंतराव गोवरीकर
१९४८ : प्रसिद्ध भारतीय चित्रपट अभिनेता फारुख शेख यांचा जन्मदिन.
१९५६ : ग्वाल्हेर घराण्याचे गायक मुकूल शिवपुत्र यांचा जन्म.
१९५९ : किर्ती आझाद क्रिकेटपटू आणि खासदार
१९६० : रमण लांबा क्रिकेटपटू (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९९८)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३१६ : अल्लाउद्दीन खिलजी दिल्लीचा सुलतान (जन्म:)
१९३१ : भारतीय पत्रकार आणि राजकारणी गणेश शंकर विद्यार्थी यांचे निधन. (जन्म: २६ ऑक्टोबर १८९०)
१९३५ : मोरेश्वर वासुदेव तथा नरकेसरी अभ्यंकर स्वातंत्र्यसैनिक, टिळकांच्या विचारसरणीचे मध्य प्रांताचे काँग्रेस नेते, वकील (जन्म: १९ ऑगस्ट १८८६)
१९४० : आसामी कादंबरीकार उपन्यास सम्राट रजनीकांत बर्दोलोई यांचे निधन. (जन्म: ११ डिसेंबर १८६७)
१९४३ : हुतात्मा वीर भाई कोतवाल (जन्म:)
१९४४ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (जन्म: २३ एप्रिल १८७३)
१९७५ : सौदी अरेबियाचा राजा फैसल यांचे निधन
१९८९ : सफदर हश्मी मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार (जन्म: १२ एप्रिल १९५४)
१९९१ : जयपूर-अत्रौली घराण्याचे गायक वामनराव सडोलीकर यांचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९०७)
१९९३ : सुप्रसिध्द लेखक मधुकर केचे.
१९९९ : विमला फारुकी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या आणि महिला चळवळीतील कार्यकर्त्या (जन्म:)
२००२ : अनिल अग्रवाल पर्यावरणवादी (जन्म: १९४७)
२०१४ : भारतीय चित्रपट अभिनेत्री नंदा यांचे निधन

# पोहरागड येथे ऐतिहासिक बंजारा जनजागृती मेळावाचे आयोजन

जालना । प्रतिनिधी

परतुर २५ मार्च बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र तीर्थक्षेत्र पोहरागड येथे यंदा चैत्र नवरात्री निमित्त दुहेरी ऐतिहासिक सोहळा पार पडणार असून अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळावा आणि माताजी मंदिरावर प्रथमच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी असा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बंजारा ब्रिगेडचे प्रदेश संघटक अर्जुन नायक यांनी केले आहे. बंजारा ब्रिगेडच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास देशभरातील संत-महंत व बंजारा समाजातील प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. आमदार धर्मगुरू बाबूसिंगजी महाराज, अनंत कबीरदास महाराज, महंत सुनील महाराज, महंत जितेंद्र महाराज, महंत शेखर महाराज, महंत यशवंत महाराज, महंत रमेश महाराज,



महंत खुशाल महाराज, महंत प्रकाश महाराज यांच्यासह अनेक मान्यवर या मेळाव्यात मार्गदर्शन करणार आहेत.

दरम्यान, बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांच्या पुढाकारातून पोहरागडावरील पवित्र माताजी मंदिरावर इतिहासात पहिल्यांदाच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी केली जाणार आहे. सकाळी ९ वाजता होणाऱ्या या सोहळ्यासाठी सुमारे १५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, या उपक्रमामुळे संपूर्ण बंजारा समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षी लाखो भाविक माता जगदंबा, संत सेवालाल महाराज व रामराव बापू यांच्या दर्शनासाठी पोहरागड येथे येतात. मात्र यंदाचा सोहळा विशेष ठरणार असून धार्मिक आणि सामाजिक एकजुटीचा अनोखा संगम या निमित्ताने पाहायला मिळणार आहे. याच दिवशी पोहरादेवी येथे सायंकाळी ५ वाजता बामणगाव रोडवरील महाराज मंदिर मैदानात अखिल भारतीय बंजारा समाज जनजागृती मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्यात समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक प्रश्नांवर चर्चा होणार असून विशेषतः एसटी आरक्षणासह विविध महत्त्वाच्या विषयांवर दिशा ठरवली जाणार आहे. महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांतून लाखोंच्या संख्येने बंजारा बांधव उपस्थित राहणार असल्याने हा मेळावा ऐतिहासिक ठरणार आहे. समाजाच्या एकजुटीचा संदेश देणाऱ्या या भव्य सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी सर्व भटक्या-विमुक्त बंजारा समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अर्जुन नायक यांनी केले आहे.

## क्रीडांगण विकास निधीत अनियमितता; शाळेवर निधी परत करण्याची नामुष्की




नांदेड । प्रतिनिधी

क्रीडांगण विकासासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीच्या वापरात गंभीर अनियमितता उघड झाल्याने पळसगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला तब्बल १०.७८ लाखांची रक्कम सव्याज परत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या घटनेमुळे शिक्षण व क्रीडा विभागात खळबळ उडाली असून संबंधितांवर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या आदेशानुसार, सन २०२२-२३ मधील क्रीडांगण विकास योजनेअंतर्गत शाळेस ७ लाखांचे अनुदान देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्ष पाहणी अहवाल व चौकशी समितीच्या निष्कर्षांनुसार या निधीचा योग्य वापर न झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

शासन निर्णयानुसार १८ टक्के दराने व्याज लावून एकूण रक्कम १०,७८,००० इतकी झाली असून ती १५ एप्रिल २०२६ पर्यंत परत करण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत. अन्यथा पुढील कठोर कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे. पळसगाव येथील नागरिकांनी बळवंत शिंदे व इतर यांनी स्वाक्षऱ्या करून केलेल्या तक्रारीनंतर हे प्रकरण समोर आले. त्यानंतर चौकशी समितीने प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर केला आणि अखेर हा मोठा गैरव्यवहार उघड झाला.

जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, ''अनुदानाचा विनियोग नियमांनुसार झाला नसल्यास परतफेड अपरिहार्य आहे.'' त्यामुळे संबंधित जबाबदारांवर कारवाईची शक्यता अधिक बळावली आहे.

## घरकुल निधीवरून जिल्ह्यात सताप; बंजारा ब्रिगेडचा आंदोलनाचा इशारा

परतुर । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अंतर्गत मंजूर घरकुल लाभार्थ्यांना निधी न मिळाल्याने प्रशासनाविरोधात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. सन २०२४२०२५ मध्ये मंजूर झालेल्या अनेक घरकुलांना आजपर्यंत एकही हप्ता न मिळाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, या प्रश्नावर आता राजकीय वातावरणही तापू लागले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शासनाकडून निधी उपलब्ध असतानाही तो जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जालना कार्यालयातून लाभार्थ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. परिणामी, गरीब व गरजू कुटुंबांचे घरकुल बांधकाम पूर्णपणे ठप्प झाले असून अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडली आहेत.

या पार्श्वभूमीवर अर्जुन नायक (महाराष्ट्र प्रदेश सचिव, अशासकीय सदस्य) यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देत प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच प्रलंबित निधीचे हप्ते त्वरित वितरित करावेत, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे. राजकीय पातळीवर हालचाली वाढल्या या प्रकरणाची माहितीस्तव पालकमंत्री अतुल सावे आणि पंकजा मुंडे यांनाही पाठविण्यात आली आहे. त्यामुळे हा प्रश्न आता जिल्हा स्तरावरून थेट राज्य पातळीवर पोहोचल्याचे दिसत आहे. आंदोलनाचा इशारा दरम्यान, या निवेदनाची तात्काळ दखल न घेतल्यास बंजारा ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. गरीबांसाठी सुरू केलेल्या महत्त्वाच्या योजनेची अंमलबजावणीच रखडल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. आता जिल्हाधिकारी आणि संबंधित यंत्रणा या प्रकरणी कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## दरोडा टाकणाऱ्या टोळीच्या मुसक्या आवळल्या

हिंगोली । प्रतिनिधी

मराठवाडा, विदर्भासह पश्चिम महाराष्ट्रात दरोडा टाकून पोलिसांना आव्हान देणाऱ्या टोळीतील पाच जणांना हिंगोलीच्या स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून एका विधी संघर्षग्रस्त बालकाची चौकशी केली जात आहे. २०० सीसीटीव्ही फुटेज अन् तांत्रिक विश्लेषणावरून पोलिसांनी कोल्हापूर भागातून त्यांना अटक केली.

तालुक्यातील नांदुरा येथील संदीप तनपुरे यांना जवळा-खांबाळा शिवारात एका काळ्या स्कार्पिओ वाहनातून आलेल्या दरोडेखारांनी १३ मार्च रोजी रात्री १० वाजता अडवून त्यांच्याकडील ४२ हजार रुपये रोख पळविले होते. या



प्रकरणी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले यांनी गुन्हे शाखेचा तपासाचे आदेश दिले होते. त्यासाठी सहायक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे यांचे विशेष पथक नियुक्त केले होते. यामध्ये उपनिरीक्षक श्रीदेवी वग्गे, माधव जिव्हारे, दिलीप मोरे, जमादार भुजंग कोकरे, गजानन पोकळे, शिवाजी जालमिरे यांची पथके मराठवाड्यासह विदर्भात रवाना केली होती. पोलिस पथकाने सुमारे २०० पेक्षा अधिक सीसीटीव्ही फुटेज पाहून माहिती घेतली असता सदर गुन्हा करणारी कुख्यात टोळी असून टोळी प्रमुख मुख्य गुन्हेगार हा सौरभ विलास शिंदे (रा. फुलगाव जि. पुणे) असल्याचे स्पष्ट झाले. सर्वजण कोल्हापूर भागात असल्याच्या माहितीवरून पोलिसांनी रविवारी त्यांना कोल्हापूर जिल्ह्यातून सौरभ शिंदे (रा. फुलगाव), शुभम तापकीर (रा. भीमाकोरेगाव), गजानन मैदकर (रा. पेरनेगाव जि.पुणे), अभिजित बंडु गदळे (रा. वाघोली जि. पुणे) यांना अटक केली तर एक विधी संघर्षग्रस्त बालकाची चौकशी केली. अधिक चौकशीत त्यांनी गुन्हयाची कबुली देऊन वाशिम जिल्ह्यात ट्रक चालकाला अडवून दरोडा टाकल्याचे सांगितले. तसेच सदर गुन्ह्यासंदर्भात टीप देणारा आरोपी गजानन गोविंदा गोरे (रा. सोनखास, जि. वाशिम) याला पोलिसांनी अटक केली. सदरचे आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्यांच्यावर पुणे व परिसरात १६ गुन्हे दाखल आहेत. हिंगोली जिल्ह्यात सन २०१७ मध्ये दरोडा टाकल्या संदर्भानसुध्दा गुन्हा दाखल आहे. सदरचे गुन्हेगार हे सराईत गुन्हेगार असून पुणे जिल्ह्यातून हद्दपार असल्याची प्राथमिक माहिती आहे. आरोपीकडून चोरी गेलेली रोख रक्कम २६ हजार रुपये व गुन्ह्यात वापरलेली स्कार्पिओ जीप व मोबाईल असा एकूण १६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## जलस्वराज्य प्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश

लातूर । प्रतिनिधी

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे लक्कड जवळगा येथील जलस्वराज्य योजनेतील कथित गैरप्रकार प्रकरणी दोषी संबंधितांवर पोलीस गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा परिषद लातूरच्या पंचायत विभागाने दिले आहेत.

याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद लातूर यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती शिरूर अनंतपाळ यांना पत्र पाठविले आहे. या पत्रात ग्रामपंचायत कार्यालय लक्कड जवळगा येथील तत्कालीन जलस्वराज्य प्रकल्पाचे अध्यक्ष, सचिव तसेच संबंधित ग्रामसेवक यांच्यावर पोलीस गुन्हा नोंद करण्याची आवश्यक कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणी यापूर्वीही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड तसेच जिल्हा परिषद कार्यालयाकडून पत्रव्यवहार झालेला होता. मात्र, अद्यापपर्यंत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची कारवाई न झाल्याने लक्कड जवळगा येथील रहिवासी दयानंद कुंभार यांनी दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या तक्रारी प्रकरणी कारवाई करण्याच्या मागणीसाठी धरणे आंदोलन सुरू केले आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेकडून पुन्हा एकदा स्पष्ट मार्गदर्शन देत तात्काळ पोलीस गुन्हा नोंद करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता या प्रकरणात पुढील काय कारवाई होते याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## नदीपात्रातील अवैध रेती उपसासाठीचे तराफे जाळले; ४० ब्रास वाळूचा साठा जप्त

परभणी । प्रतिनिधी

पूर्णा तालुक्यात अवैध वाळू उपसाच्या विरोधात महसूल विभागाने कारवाई करत सातेफळ (वाघ) परिसरातील नदीपात्रात बसवलेले तराफे जाळून नष्ट केले. मात्र, दुसरीकडे नियमबाह्य वाळू उपसा सुरूच असल्याने प्रशासनावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

२४ मार्च रोजी दुपारी महसूल पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार सातेफळ शिवारातील नदीपात्रात काही अज्ञातांनी अवैध रेती उपसासाठी थर्मलचे तराफे उभारले होते. तहसीलदार बोथीकर, मंडळ अधिकारी सेलगावकर, तलाठी राठोड, चरपिवार तसेच कोतवाल श्रीधर गडगिळे यांच्या पथकाने घटनास्थळी धडक देत जेसीबीच्या सहाय्याने हे तराफे बाहेर काढले आणि जाळून टाकले. यापूर्वीही याच ठिकाणी सुमारे ४० ब्रास वाळूचा साठा जप्त करण्यात आला होता. तथापि, महसूल विभाग अधूनमधून अशा कारवाया करून कडक भूमिका घेत असल्याचे दाखवत असला तरी तालुक्यातील इतर नदीपात्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

ज्या ठिकाणी वाळू घाटांचा लिलाव झालेला नाही, त्या भागांतही जेसीबी व बोटींच्या सहाय्याने रेती काढून तिची वाहतूक व विक्री सुरू असल्याकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, लिलाव झालेल्या वाळू घाटांमधूनही नियमांचे उल्लंघन होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. कंठेश्वर, सातेगाव आणि टाकळी येथील गोदावरी नदीपात्रातील घाटांचा ठेका नांदेड येथील एका कंत्राटदाराकडे असून, तेथे जेसीबी व बोटींच्या सहाय्याने नियमबाह्य पद्धतीने दिवस-रात्र वाळू उपसा होत असल्याची तक्रार भ्रष्टाचार विरोधी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. या संदर्भात राजकुमार सूर्यवंशी, चंद्रमणी लोखंडे, मनोज भुजबळ, सूर्यकांत रायबोले, नामदेव कणकटे आणि नितीन दवणे यांनी जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना निवेदन देत संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करून परवाना रद्द करण्याची मागणी केली आहे.

अन्यथा २८ मार्च रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या सर्व घडामोडींमुळे पूर्णा तालुक्यात अवैध वाळू उपसा आणि प्रशासनाच्या भूमिकेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.



## मंदिर परिसरात मांसविक्री बंदीचा विचार करू-मंत्री गोगावले

धाराशिव । प्रतिनिधी

मंदिरांना अधिक स्वायत्तता देणे तसेच मंदिरांच्या ५०० मीटर परिसरात मांसविक्रीवर बंदी घालण्याच्या मागण्यांवर शासन सकारात्मक असून, हा विषय लवकरच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत मांडला जाणार असल्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी सांगितले.

तुळजापूरमध्ये हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी मंदिर परिसरातील मांसविक्रीचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर गोगावले यांनी यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. मंदिरांचे पावित्र्य व स्वच्छता राखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करू, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. याप्रसंगी तुळजाभवानी पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.


### जाहीर प्रगटन

**मा. माणिकराव रा. सातव ७ वे सह. दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ३४२/२०२६**

**शेषराव व इतर वि निरंक**

अर्जदार : १ शेषराव पि. भिवराव उबाळे, वय ८० वर्षे धंदा निरंक रा. शिवाजीनगर ता. जि. बीड २.देवराव पि. भिवराव उबाळे, वय ६९ वर्षे, धंदा शेती, रा. च-हाटा, ता. जि. बीड., ३ श्रीमंत पि. भिवराव उबाळे,, बस ६३ वर्षे, धंदा सेवानिवृत्त, रा शिवाजीनगर ता. जि बीड, ४ बलभिम पि. भिवराव उबाळे, व्य ६६ वर्षे, धंदा, सेवानिवृत्त, रा. शिवाजीनगर ता. जि बीड, ५ कौशल्या भ्र.सखाराम रसाळ, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम, रा. मित्रनगर, बीड, ता जि बीड, ६ सुमनबाई भ्र. गोरक्षनाथ गायकवाड, वय ७३ वर्षे, धंदा घरकाम,रा. केतुरा ता. जि. बीड

विरुध्द गैरअर्जदार निरंक

मागणी: कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत भिवराव काशीबा उबाळे व भागीरथी भ्र. भिवराव उबाळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी -भिवराव काशीबा उबाळे यांचा मृत्यु दि. ३१/०१/२०२२ रोजी मौजे च-हाटा ता. जि. बीड व भागीरथी भ्र. भिवराव उबाळे ही दिनाक ११/०६/२०१९ रोजी, मौजे च-हाटा ता. जि. बीड येथे मयत झालेले असून अर्जदार हेच मयत भिवराव काशीबा उबाळे व भागीरथी भ्र. भिवराव उबाळे यांचे वारस आहेत, वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवाश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनत्तेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुपत्तीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार छयांचे हक्काव्यदक्ष लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत भिवराव काशीबा उबाळे व भागीरथी भ्र. भिवराव उबाळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याचीनोंद घ्यावी, आज दिनाक २३ माहे ०३ सन २०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि ३० /०४/२०२६ आहे.

आदेशावरुन

स्वाक्षरित

**अधिक्षक**

दिवाणी न्यायालय व.स्तर बीड


## संभाजीनगर महापालिकेची पहिलीच सभा वादळी ठरण्याची शक्यता

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महापालिकेची पहिलीच सर्वसाधारण सभा येत्या २७ मार्च रोजी होत आहे. या सभेत प्रशासनाकडून केवळ दोन विकास कामाचेच विषय मंजुरीस्तव ठेवले आहेत. मात्र, असे असले तरी दहा नगरसेवकांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी संतोष वाहुळे, उपायुक्त अंकुश पांढरे, लखीचंद चव्हाण यांच्या नियुक्तीसह नगररचना, शिक्षण विभागातील बदल्या आणि इतर प्रशासकी कामकाजातील मनमानीपणावर प्रश्न उपस्थित केला आहे. त्यामुळे पहिलीच सर्वसाधारण सभा वादळी ठरणार असल्याचे चित्र दिसत आहे.

महापालिकेच्या निवडणुकीनंतर महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेते आणि विषय समितींच्या सभापतींच्या निवडीनंतर आता पहिलीच सर्वसाधारण सभा येत्या २७ मार्च रोजी होत आहे. तब्बल साडेपाच




वर्षांनंतर महापालिकेची सभा होत असल्याने प्रत्येक नगरसेवकांमध्ये उत्सुकता दिसत आहे. २९ प्रभागांतून ११५ नगरसेवक निवडून आले असून प्रत्येकजण आपापल्या प्रभागातील समस्या आणि अडचणींवर प्रशासनाला धारेवर धरण्याच्या तयारीत आहेत. पहिल्या सभेत एकूण ८ विषय मंजुरीस्तव ठेवले आहेत. त्यातील पहिल्या दोन विषयांपैकी एक महात्मा बसवेश्वर पुतळ्याची उंची वाढविण्याचा अन् दुसरा रस्त्यावरील पॅचवर्कच्या कामासाठी डांबर खरेदीचा विषय आहे. त्याशिवाय रस्त्याच्या नामकरणाचे तीन, पुतळा उभारणीचा एक आणि दोन धार्मिक स्थळांना दर्जा देणाऱ्या विषयाचा समावेश आहे. नगरसेवक अफसर खान यांनी शहरातील पाणीपुरवठ्यावर प्रश्न उपस्थित केला आहे. कुठे आठव्या तर कुठे दहाव्या दिवशी पाणीपुरवठा होतो. मात्र काही वसाहतींना चार दिवसांआड पाणी कसे मिळते, असा सवाले त्यांनी विचारला आहे.

तर त्र्यंबक तुपे यांनी शहरातील बीओटी आणि प्रशासकांच्या साडेपाच वर्षाच्या काळात महापालिकेच्या मालकीच्या किती जागा भाडेतत्त्वावर किती वर्षांसाठी दिल्या, त्यातून मनपाला किती उत्पन्न मिळते, असा सवाल केला आहे. मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका काय करते, जालना रोडवर अतिक्रमण हटवण्याची कारवाई करताना काही ठिकाणी मालकी हक्काची घरे दुकाने पाडली. त्यांच्या मोबदल्याचे काय झाले, असे वैशाली कोरडे यांनी विचारले आहे. फेरोज खान यांनी मुलभूत प्रश्न उपस्थित करतांना, मुख्य लेखा व वित्त अधिकारी संतोष वाहुळे यांना किती वर्षांसाठी नियुक्ती दिली. नक्षत्रवाडीतील ग्रुप हाऊसिंग स्कीममधील अनियमितता, मिटमिटा येथील तापडीया कन्स्ट्रक्शनच्या शालेय आरक्षणातील जागेचा मोबदला देताना रोख रकमेऐवजी टीडीआर का दिला नाही. शिक्षकांच्या बदल्यातील अनियमितता, याबाबत प्रशासनाला जाब विचारला आहे. तर दया गायकवाड यांनी विचारले आहे की, महापालिकेत सहा उपायुक्तपद मंजूर असून त्यात ३ प्रतिनियुक्तीचे आणि ३ महापालिका आस्थापनेवरील आहे. मात्र, सध्या मनपात ८ उपायुक्त कार्यरत असून अतिरिक्त दोन उपायुक्त कोणाच्या आदेशाने सेवेत आहेत. या सगळ्या प्रश्नांना प्रशासनाकडून कशी उत्तरे दिली जातात आणि त्यावर नगरसेवक किती समाधानी होतात हे सभे दरम्यान दिसणार आहे.

# बीड जिल्हा परिषदेच्या १७ कोटी ७६ लाखाच्या अर्थसंकल्पास मंजुरी



## सीईओ जितेंद्र रहमान यांनी सादर केले अंदाजपत्रक

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेचा सन २०२६–२७ या वर्षासाठी १७ कोटी ७६ अर्थसंकल्प सादर करण्यात आला. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी मंगळवार दि.२६ रोजी शिलकी अर्थसंकल्प सादर केला. विविध विभागाचा १७ कोटी ७६ लक्ष १८ हजार इतका विविध विभागावर खर्च करण्यात येणार आहे.**

विभागनिहाय पुढील प्रमाणे खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. बांधकाम विभाग ३,०८,३५,००० हजार, शिक्षण विभाग २३०,५१,०००/, आरोग्य विभाग २,७९,० ४०००)/, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ३०,०००००/, समाज कल्याण विभाग दोन कोटी ४८ लाख ८ हजार, महिला व बालकल्याण विभाग ६५ लक्ष ६८ हजार, कृषी विभाग ३४ लक्ष ४० हजार, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग ५६ लक्ष ११,०००, पंचायत राज कार्यक्रम विभाग पाच कोटी २३ लक्ष ९५ हजार या प्रमाणे तरतूद करण्यात आली. यावर्षी जिल्हा परिषदेने जुन्या काही योजना बंद करत अनेक नाविन्यपूर्ण योजना सादर केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील शाळकरी मुलींसाठी सायकल, मागासवर्गीय भागात अभ्यासिका उभारणे, दिव्यांगासाठी दुचाकी योजना, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांमध्ये सीसीटीव्ही आदी योजना प्रस्तावित आहेत. यासाठी जिल्हा परिषदेच्या शोधनिधीतून तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम आणि अन्य निविदेसाठी एक कोटीसाठी रुपये १०००/ एक कोटीच्या पुढे १० टक्केच्या पटीनेही फिस आकारण्यात येणार आहे. विहित मुदतीत काम पूर्ण न केल्यास दंड आकारण्यात येणार आहे. अर्थसंकल्प सादर करताना मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी सादर केला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील, प्रभारी मुख्य व लेखा वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ, उपमुख्य कार्यकारी ▶▶ पान २ वर

## अपघातग्रस्तांना तात्काळ मदतीसाठी हाय–एंड टॅब्सचे वितरण

**बीड । पतिनिधी**

**बीड जिल्हा पोलिस दलाकडून अपघातग्रस्तांना तात्काळ मदत मिळावी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध अपघातसंबंधी मदत व विमा योजनांचा लाभ जलद गतीने मिळावा, या साठी राज्य शासनामार्फत देण्यात आलेले हाय एन्ड टॅब्स वितरित करण्यात आले.**




अपघातातील जखमी व मृतांच्या कुटुंबीयांना (प्रधानमंत्री राहत निधी) तसेच इतर केंद्र शासनाच्या अपघात विमा योजनांचा लाभ वेळेत मिळण्यासाठी, अपघाताची अचूक व तत्काळ नोंद होणे अत्यावश्यक असते. यासाठी आणि या प्रणालींमध्ये माहिती त्वरित भरणे गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर, बीड जिल्ह्यातील प्रत्येक पोलिस ठाण्यासाठी २ हाय–एंड टॅब्सचे वितरण करण्यात आले आहे. या टॅब्सच्या माध्यमातून अपघातासंबंधी माहिती घटनास्थळीच त्वरीत व – प्रणालीमध्ये नोंदवता येणार असून, त्यामुळे अपघातग्रस्तांना शासकीय मदत व विमा दावे लवकर मंजूर होण्यास मदत होणार आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांच्या हस्ते हे टॅब्स संबंधित ▶▶ पान २ वर

## पाटोदा तालुक्यात शवविच्छेदनासाठी विलंब

### प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यात कुसळंब, दासखेड, वहाली, नायगाव, डोंगरकिन्ही येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच पाटोदा येथील ग्रामीण रुग्णालयामार्फत नागरिकांना आरोग्य सेवा पुरवली जात आहे. मात्र, तालुक्यातील शेतकरी आत्महत्या किंवा अपघाती मृत्यू झालेल्या प्रकरणांमध्ये शवविच्छेदन (पोस्टमार्टम) करण्यासाठी मोठा विलंब होत असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे.

माहितीनुसार, पाटोदा येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनाची सुविधा उपलब्ध असतानाही संबंधित परिसरातील वैद्यकीय अधिकारी प्रत्यक्ष येईपर्यंत प्रक्रिया सुरू केली जात नाही. यामुळे मृतांच्या नातेवाईकांना तासन्तास, कधी कधी दिवसभर प्रतीक्षा करावी लागत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, संशयास्पद मृत्यू, आत्महत्या किंवा अपघाताच्या घटनांमध्ये कायद्यानुसार शवविच्छेदन तातडीने होणे ▶▶ पान २ वर

## अंधश्रद्धा–बुवाबाज ‘महिलांचे शोषणा’विरोधी कठोर कारवाई व्हावी

### राज्याचे मुख्यमंत्री यांना ‘मअंनिस’ बीड शाखेचे निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

नाशिक येथे उघडकीस आलेल्या भोंदू अशोक खरात प्रकर णाकडे केवळ त्या एका व्यक्तीच्या गुन्ह्याच्या रुपात पाहणे, ही मोठी चूक ठरेल. अंधश्रद्धा, सत्ता, संपत्ती, बुवाबाजी, ज्योतिष्य, व ’तथाकथीत अध्यात्म व दैवी शक्तीच्या’ अतिशय धोकादायक संगनमताचे हे राज्याला हादरवून सोडणारे गंभीर उदा. आहे.करिता,या व अशा प्रकरणांची चौकशी केवळ आरोपीपुरती मर्यादित न




ठेवता,त्या मागील संपुर्ण जाळ्याचा शोध घेण्याबाबत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ,बीड शाखेच्या वतीने विवेक वाहिनीच्या राज्य कार्याध्यक्ष प्राचार्य सविता शेटे यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या मा.मुख्यमंत्री महोदयांना मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत निवेदन ▶▶ पान २ वर



## जनतेच्या दारी प्रशासन शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा-चंद्रकांत शेळके

**चौसाळा । प्रतिनिधी**

जनतेच्या दारी प्रशासन या राज्य अभियानातून आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्व समाधान शिबिराचा नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आव्हान बीडचे मा तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले चौसाळा तालुका बीड येथे दिनांक २४ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्व समाधान शासन आपल्या द्वारे या शिबिराचे आयोजन केले होते माननीय विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड मार्गदर्शनाखाली माननीय कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली माननीय तहसीलदार ▶▶ पान २ वर

## गांजाचे पिक पिकवणाऱ्या ईसमावर कारवाई पावणे दोन लाखाची गांजाची झाडे जप्त

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधिक्षक बीड नवनीत काँवत यांनी अंमली पदार्थासंबंधी सुरु असलेल्या अवैध धंद्यांवर कडक कारवाई करुन त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत निर्देश दिले होते. त्याप्रमाणे पोलीस स्टेशन गेवराई यांचे पथकास गुप्त बातमीदाराकडुन खबर मिळाली की, सुशी (वडगाव) ता–गेवराई,येथील भाऊसाहेब तुरुकमारे याने त्याचे स्वतःचे



सुशी शिवारातील गट नंबर २३४ मधील शेतीमध्ये ज्वारीच्या पिकामध्ये गांजा या अंमली पदार्थाच्या झाडांची लागवड केली असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली होती.

त्याआधारे सदर ईसमावर कायद्यान्वये रेड करणे असल्याने त्यासंबंधी कायदेशीर पुर्तता करुन गेवराई पोलीसांचे पथक हे मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी रवाना झाले होते. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन गेवराई यांचे पोलीस पथक तसेच कृषी व महसुल विभागाचे कर्मचारी यांचेसह सुशी शिवारातील गट नंबर २३४ मधील शेतात पोहचुन शेतातील ज्वारीच्या पिकाची पाहणी केली असता धाड टाकुन पाहणी केली असता ईसम नामे भाऊसाहेब ▶▶ पान २ वर

## सावता प्रतिष्ठान मध्ये शब्बीर अन्सारी आणि एजाज भाई यांना श्रद्धांजली

**बीड । प्रतिनिधी**

येथील कर्मयोगी श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्टच्या वतीने महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश चिटणीस आणि मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे संस्थापक अध्यक्ष कालकथित शब्बीर अन्सारी साहेब आणि समता परिषदेच्या कार्यक्रमांमध्ये सक्रिय असणारे बीड येथील श्री एजाजभाई देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रतिष्ठान मध्ये अखिल भारतीय माळी महासंघाचे प्रा. लक्ष्मण गुंजाळ यांच्या वाढदिवसानिमित्त आणि श्री निखिल शिंदे यांची समता परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी तसेच नितीन राऊत यांची बीड शहराध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल ट्रस्टने त्यांचा सत्कार(ता..२३) आयोजित केला होता. तिन्ही मान्यवरांनी सत्काराला उत्तर देताना सावता प्रतिष्ठान राबवत असलेल्या उपक्रमाबद्दल कौतुक केले.सत्कारामुळे आम्हाला सामाजिक काम करण्याचं आणखी बळ येईल, आपल्या सदिच्छा सदैव पाठीशी असाव्यात अशा भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ▶▶ पान २ वर

## बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा विमा रकमेबाबत आक्रोश

### १ मे रोजी राज्यभर ध्वजारोहणानंतर प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील २०२५ च्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागलेल्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्यापही जाहीर केलेली विमा रक्कम मिळालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी



व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर दि २३ मार्च रोजी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना स्मरणपत्र सादर करण्यात आले.

निवेदनानुसार, बीड जिल्ह्यातील मध्ये अतिवृष्टीमुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. अनेक भाग जलमय झाल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणावर ▶▶ पान २ वर

## वन विभागाने आतापर्यंत लावलेली झाडे गायब?

### जागतिक वन दिनानिमित्त फक्त फोटो शेषणपुरते वृक्षारोपण

**पाटोदा । प्रतिनिधी**

प्रत्येक वर्षी ठरल्या प्रमाणे वन विभाग लाखो रुपये खर्च करून नुसते झाडे लावतय परंतु पुढच्या वर्षी मात्र ही लावलेली झाडे दिसत नसुन ती गायब झालेली दिसतात,झाडे लावलेल्या जागेवर फक्त खड्डे दिसतात आणि पुन्हा याच खड्यात नवीन लाखो रुपये खर्च करून वृक्षारोपण करण्यात येते,गेल्या दहा वर्षांत वन विभागाने लाखो रुपये खर्चून लावलेल्या झाडांची उच्च स्तरीय चौकशी समिती नेमुन तपासणी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनतेतुन होत आहे.

पाटोदा तालुक्यात दर वर्षी वन विभाग लाखो रुपये खर्च करून नुसते झाडे लावतय परंतु पुढच्या वर्षी मात्र ही लावलेली झाडे कोठेही दिसत नाही.फक्त प्रोसेस पुरतेच दरवर्षी वृक्षारोपण करायचे आणि नुसता फोटो काढायचा,पुन्हा त्या झाडाचे संवर्धन करण्याकडे लक्ष द्यायचे नाही आणि शासनाचे लाखो रुपये पाण्यात घालायचे एवढाच उद्योग वन विभाग करताना दिसते. वन विभागाने झाडे लावणे त्या मागे एक मोठा उद्देश आहे.वन विभागाचे काम झाडे लावणे आणि त्यांचे संवर्धन करणे आहे.ज्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखले जाते आणि ▶▶ पान २ वर

## वाळुंजमध्ये बालसाहित्य संमेलनात प्रजक्ता धस यांनी जिंकली बालकांची मने

**आष्टी । प्रतिनिधी**

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे, त्यांच्यात साहित्याची गोडी निर्माण व्हावी आणि बालसाहित्याचा व्यापक प्रसार व्हावा या उदात्त हेतूने वाळुंज (ता. आष्टी, जि. बीड) येथे सोमवार, दि. २३ मार्च २०२६ रोजी भव्य बालसाहित्य संमेलन उत्साहात संपन्न झाले. भैरवनाथ मंदिरासमोरील प्रशस्त परिसरात पार पडलेल्या या एकदिवसीय संमेलनात ग्रंथदिंडी, काव्यवाचन, कथाकथन, मुलाखती आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा समृद्ध संगम अनुभवायला मिळाला.**

या संमेलनाचे आयोजन यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्या सहकार्याने तसेच शरद पवार इन्स्पायर फेलोशिप–२०२५ अंतर्गत करण्यात आले होते. जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम विशेष प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक ग्रंथदिंडीने झाली. विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ आणि मान्यवर मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. या दिंडीद्वारे साहित्यप्रेमाचा संदेश देण्यात आला.




संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी सौ. प्राजक्ताताई सुरेश (अण्णा) धस होत्या, तर अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी डॉ. कैलास दौंड होते. उद्घाटक म्हणून शिक्षण विभाग प्रमुख योगेश कुदळे आणि संदीप पवार उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. वाळुंज शाळेच्या बालचमूने स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. यावेळी कवी हनुमंत चांदगुडे (बारामती) व कवी शंकर कसबे (तुळजापूर) यांची विशेष उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांमध्ये डॉ. विठ्ठल जाधव, मनीषा सातपुते, शितल शिंदे, किशोर सोले, मारुती पठाडे, महेश शिंदे, सुनीता उगले, सुरेश पवार, सोमनाथ वाळके, प्रा. सय्यद अल्लाउद्दीन, वि. भा. साळुंके, अजय घोडके, केतन पाटील, प्रा. मिलींद काटे, गौतम आजबे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. हरिष हातवटे यांनी केले. स्वागताध्यक्ष म्हणून बोलताना सौ. प्राजक्ताताई धस यांनी सांगितले की, साहित्यिकांमुळेच जगाला मानवी जीवनाचा अर्थ सांगणारी साहित्यसंपदा लाभली आहे. बालसाहित्यातूनच व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असून अशा संमेलनांमुळे मुलांचा सर्वांगीण विकास घडतो. त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात आलेल्या धोरणांचा उल्लेख करत स्त्री प्रगतीचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. कैलास दौंड म्हणाले की, मुलांची विचारशक्ती जागृत करणे अत्यंत आवश्यक आहे. “ज्या विचारांना भंग नाही तोच अंभग” असे सांगत त्यांनी साहित्य संमेलनातून विचारांची पेरणी होते आणि मुलांच्या कल्पनाशक्तीला बळ मिळते, असे मत व्यक्त केले. यानंतर वाळुंज शाळेच्या मुलींनी “आम्ही शिवकन्या” हे गीत सादर करून उपस्थितांची ▶▶ पान २ वर

## मुलींना त्रास देणाऱ्या टवाळखोरांवर दामिनी पथकाचा कारवाईचा दणका

### मागील चार दिवसात १९ टवाळखोरांवर कारवाई

**बीड । पतिनिधी**

**दामिनी पथक प्रमूख पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मीना बाजारात काही टवाळखोर मुलींना त्रास देत आहेत. त्यावरून दामिनी पथक हे मीना बाजारात दाखल झाले. साध्या वेशात पथक बाजारात गस्त करत असताना काही टवाळखोर मुलींच्या मागे मागे फिरणे, काहीतरी हावभाव किंवा इशारे करताना मिळून आले. त्यांना पोस्टे बीड शहर येथे हजर करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.**

तसेच बाजाराच्या बाहेरच्या आवारात ही काही टवाळखोर मिळून आले, त्यांना सर्वांना ताब्यात घेवून पोस्टे शिवाजीनगरला हजर करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांचे समुपदेशनही करण्यात आले आहे. अशा एकूण १९



टवाळखोरांवर मागील चार दिवसात मुंबई पोलीस अधिनियम कलम ११०/११७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर, अप्पर पोलीस ▶▶ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26